* सुविचार *
प्रत्येक माणसाचं बोलणं मनावर घेऊ नका, कारण माणसे तुम्हाला काय बोलतात यावरून त्यांची लायकी कळते तुमची नाही.

गुन्हेगारी-घटनेस वाचा फोडुन झुंज देणारे एकमेव दैनिक

# दैनिक झुंजार जनता

R.N.I. No.MAHMAR/2022/82590 Mo. 8180068180

वर्ष :३ रे | अंक १७८ | बुधवार दि. 19 /03/ 2025 | पाने ४ | किमत ४ रु | POSTAL Reg.No.CSN/RNP/537/2024-2026

## महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सभासद नोंदणीला कळमनुरी तालुक्यात सुरवात

**कळमनुरी प्रतिनिधी - प्रसाद गावंडे**
आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या दृष्टिकोनातून अधिकाधिक सक्रिय सदस्य नोंदवण्यासाठी आता राष्ट्रवादी काँग्रेसकडून (NCP) राज्यभरामध्ये सदस्य नोंदणी अभियानाला सुरवात केलेली आहे. या अभियानासाठी जिल्हाध्यक्ष ,शहराध्यक्ष, तालुका अध्यक्ष पदाधिकारी, आमदार, खासदार या सर्वांनाच कामाला लावण्यात आला आहे. आगामी काळामध्ये वेळ पडल्यास स्वबळावर



निवडणुका लढाव्या लागू शकतात या दृष्टिकोनातून पक्षाची ताकद वाढवण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जात असल्याचं सांगितलं जात आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, राष्ट्रवादी काँग्रेस चे हिंगोली जिल्हा अध्यक्ष बी.डी बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली ह्या सभासद नोंदणीला कळमनुरी तालुक्यामध्ये आज सुरवात करण्यात आलेली आहे अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे कळमनुरी तालुका अध्यक्ष विजय पाटील गावंडे यांनी सांगितले. पक्ष संघटना वाढवण्यासाठी सभासद नोंदणी करणे अत्यंत आवश्यक असतं. या सभासद नोंदणीच्या माध्यमातून सामान्य लोकांना पक्षाशी जोडता येतं. या माध्यमातून जास्तीत जास्त सभासद जोडल्यास याचा फायदा आगामी महापालिका निवडणुकीमध्ये पक्षाला होणार आहे, असे विजय पाटील गावंडे यांनी सांगितले.

सभासद नोंदणीमध्ये लाडक्या बहिणी योजनेच्या माध्यमातून पक्षाच्या संपर्कात आलेल्या महिलांना देखील पक्षांशी जोडण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. ही सभासद नोंदणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्रात सुरू आहे. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवण्याची देखील पक्षाची तयारी असल्याचं गावंडे यांनी सांगितलं. तसंच कठीण काळामध्ये जे पक्षासोबत राहिले त्यांनाच उमेदवारीसाठी प्राधान्य राहील, असे देखील गावंडे यांनी स्पष्ट केलं. यावेळी गावंडे यांच्या सोबत बाजीराव सवंडकर तसेच हिंगोली जिल्हा उपाध्यक्ष अरुण मैड, , युवक जिल्हा उपाध्यक्ष संतोष आम्ले, बाळापूर शहरध्यक्ष श्याम खाडे, तालुका उपाध्यक्ष अजमत फारुखी, मारोती कदम, ज्ञानेश्वर मगर, मुकिंदा सवंडकर आदी पदअधिकारी उपस्थित होते..

# नागपूर दंगलीचा राजकीय शिमगा

## हा सुनियोजित कट, 'छावा' सिनेमानंतर लोकांचा राग समोर येतोय - फडणवीस

**मुंबई** : औरंगजेबाची कबर उखडून टाकण्याचा इशारा विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाने दिल्यानंतर सोमवारी रात्री नागपूरमध्ये दंगल उसळली. नागपूरमधील दंगलीचे मंगळवारी विधानसभेत पडसाद उमटल्यानंतर सभागृहात व सभागृहाबाहेर यावरून राजकीय शिमगा पाहायला मिळाला. दरम्यान, 'छावा' सिनेमामुळे छत्रपती संभाजी महाराजांचा खरा इतिहास समोर आला आहे. 'छावा' सिनेमानंतर लोकांचा राग समोर येतोय. नागपूर येथील दंगल पूर्वनियोजित असल्याचे निदर्शनास आले असून दंगा करण्याचा प्रयत्न केला, तर जात-धर्म बाजूला ठेवून कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे. विरोधकांनी मात्र केंद्रात आणि राज्यात भाजपचे सरकार असताना, अशा दंगली होत असल्याने सत्ताधारी आणि गृहमंत्र्यांवर या दंगलीचे खापर फोडले.

नागपूर येथील हिंसाचारात पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांना सोडणार नाही,



### ३३ पोलीस, ५ नागरिक जखमी

नागपूरमध्ये जमावाने एक क्रेन आणि काही चारचाकी वाहने जाळली. या सगळ्या घटनांमध्ये एकूण ३३ पोलीस जखमी झाले. यामध्ये ३ उपायुक्त दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्यांचा समावेश आहे. एका पोलीस अधिकाऱ्यावर कुऱ्हाडीने हल्ला करण्यात आला. या हिंसाचाराच्या घटनेत ३३ पोलीस व ५ नागरिक जखमी झाले. यापैकी तिघांना घरी सोडण्यात आले आहे, दोन जण रुग्णालयात आहेत. त्यापैकी एकाला अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले आहे.

### वादग्रस्त वक्तव्ये टाळा!

**मुख्यमंत्र्यांकडून नितेश राणेंना तंबी**

**मुंबई** : वादग्रस्त विधाने आणि मंत्री नितेश राणे हे जणू समीकरणच बनले आहे. आता नागपूरमधील हिंसाचाराचे पडसाद राज्यभर उमटल्यानंतर भाजपचे मंत्री नितेश राणे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वादग्रस्त वक्तव्य टाळण्याची तंबी दिली आहे.

### आधीच नियोजन केले असावे - एकनाथ शिंदे

ही दंगल पूर्वनियोजित होती, असे प्रत्यक्षदर्शींकडून पुरावे मिळत आहेत. दंगल झालेल्या भागात एके ठिकाणी दररोज १००-१५० दुचाकी उभ्या असतात. मात्र, दंगलखोरांची एकही दुचाकी काल त्याठिकाणी नव्हती. पेट्रोल बॉम्ब, लाठ्या, तलवारी इतक्या मोठ्या प्रमाणात अचानक कशा काय जमवल्या? यासाठी आधीच नियोजन केले गेले असावे, असा संशय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

### गृह खाते झोपा काढत होते का? - उद्धव ठाकरे

नागपुरातील दंगल पूर्वनियोजित असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. मग मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडे असलेले गृह खाते झोपा काढत होते का? असा सवाल शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला. "औरंगजेबाचे समर्थन कोणीही शिवप्रेमी करणार नाही. त्याचं थडगं उकरण्याची केवळ भाषा करण्यापेक्षा कृती करा. डबल इंजिन सरकार फक्त वाफा सोडतंय का? मुख्यमंत्र्यांनी ही कबर उखडण्यात असमर्थता दाखवलेली आहे. गुजरातमध्ये जन्माला आलेल्या औरंगजेबाला ज्या महाराष्ट्राने मूठमाती दिली त्याची कबर तुम्ही उद्ध्वस्त करा आणि तो सोहळा कराल तेव्हा प्रमुख पाहुणे म्हणून नितीश कुमार, चंद्राबाबू नायडूंना बोलवा. सोपा विषय आहे. त्यात दंगल करण्याचे कारण काय?," अशी टीका उद्धव ठाकरेंनी केली.

### औरंगजेब कबरीजवळील रस्त्यावर बॅरिकेडिंग

दरम्यान, औरंगजेब प्रकरणावरून देशभरात मोठा गदारोळ होत असून कबर उखडून फेकण्याचा इशारा काही हिंदुत्ववादी संघटनेने दिल्यामुळे खुल्ताबाद शहरात औरंगजेब कबर परिसरातील दर्ग्याजवळ चोहोबाजूंनी कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. तर खुलताबाद शहरात येणाऱ्या प्रमुख रस्त्यावर बॅरिकेड लावून प्रत्येक वाहनांची, पर्यटकांची आणि नागरिकांची चौकशी पोलीस करत आहेत. औरंगजेब कबर पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांचे नाव, नंबर, आधार कार्ड तपासले जात असून त्याची नोंद घेतली जात आहे. तसेच कबर परिसरात मोबाइल नेण्यास बंदी घालण्यात आली आहे.

## हिरकणी महिला प्रभाग संघ शिऊर यांची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली.

वैजापूर प्रतिनिधी अर्जुन शिंदे. उमेद अभियाना अंतर्गत महाराष्ट्रभर चाललेल्या बचत गटाला प्रशिक्षण देऊन स्वतःचा उद्योग, लघुउद्योग, गांडूळ प्रकल्प, पापड लोणची बनवणे, या प्रकारचे छोटे व्यवसाय सुरू करून महिलांना स्वतःच्या गावात रोजगार निर्मिती चे काम करत आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती साधना अरुण त्रिभुवन, कोषाध्यक्ष राणी प्रकाश वाघचौरे व सचिव मंदा समाधान पळसकर ह्या होत्या.

यावेळी जिल्हा व्यवस्थापक श्री बिभिशण भुईटे, जिल्हा व्यवस्थापक



आर्थिक समावेशक श्रीमती.सुचिता खोतकर, शिऊर बंगला येथील बँक ऑफ इंडियाचे मॅनेजर श्री एस बी वैद्य, बँक ऑफ महाराष्ट्राचे मॅनेजर श्री जिनेन्द्र डोईजन, शिऊरचेभूमी पुत्र माजी उद्योग संचालक श्री जे. के. जाधव, तालुका अभियान व्यवस्थापक सचित गिलके, तालुका एम आय एस संदीप सावंत, आयबीसीबी मंगल त्रिभुवन, प्रभाग समन्वय वाल्मीक गायकवाड, मुकुंद राज काळे, दत्तात्रय घोडके, संदीप जाधव, पाणी फाउंडेशन चे तालुका समन्वयक गणेश सूर्यवंशी, ट्रेनर बाळू चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. दीपक गाजरे, सुनील पैठण पगारे, अनिल भोसले, बाळा पाटील जाधव, लक्ष्मी कुंदे व समस्त शिवुर ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच व सदस्य यांनी या कार्यक्रमास विशेष सहकार्य केले.

या कार्यक्रमास शिऊर पंचक्रोशीतील सर्व ग्राम संघ, उमेद अभियानाचे बचत गट व हिरकणी महिला प्रभाग संघातील सर्व बचत गट या कार्यक्रमास उपस्थित होते. यांची संख्या जवळपास 500 च्या पार होती.

सर्व आमंत्रित मंडळींनी यांना सरकारी योजना आणि त्याचा लाभ कसा घेता येईल याबद्दल योग्य ते मार्गदर्शन केले.

## कर्मचारी एसी मध्ये तर, ग्राहक घामाघुम आय डी बी आय बँकेतील प्रकार

तळणीः- ( पंजाबराव सुर्यवंशी ) निवघाबाजार येथे राष्ट्रीय कृत एकच बँक आहे ती म्हणजे आयडीबीआय बँक या बँकेत मोठ्याप्रमाणात खाते संख्या व ग्राहक आहेत परंतू सुविधा मात्र शुन्य आहेत. सध्या उन्हाळ्याचे दिवस असून प्रत्येकजण घामाघुम होत आहे. बँकेमध्ये एअर कंडीशन ( एसी ) लावल्या आहेत पण ग्राहकांकडील एसी बऱ्याच दिवसापासून बंद अवस्थेत आहेत. कर्मचाऱ्याना बसविलेल्या एसी चालू कंडिशन मध्ये असून बंद झाल्यास त्यांना फॅनची व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र ग्राहकाना बँकेत गेल्यावर घामाघुम व्हावे लागत आहे. येथे खासगी बँका आहेत. व तिथं सुविधा ही उपलब्ध असल्याने ग्राहकानी खासगी बँकेत व्यवहार करणे चालू केले आहे. तर आयडीबीआय बँकेत सुविधा नाहीत तर शिरड, पेवा, व इतर तिन गावच्या शाळेला आयडीबीआय बँकेने दत्तक घेवून शाळेत साहीत्य खरेदी करण्यासाठी मदत दिली होती. याच मदतीमध्ये बँकेतील सुविधा पुरविल्यास ग्राहकाना याचा फायदा होईल असा प्रश्न उपस्थित होतो आहे. याबाबत शाखाधिकारी याना विचारणा केली असता त्यांनी एक दोण दिवसात कुलरची व्यवस्था करणार असल्याचे सांगितले. याकडे संबधितानी लक्ष घालण्याची मागणी सुशिल भोरे, मधुकर कदम यानी केली आहे.

## सौ.मीराबाई दहिवाळ यांचे निधन....



पाचोड/ पाचोड ता.पैठण येथील रहिवासी सौ.मीराबाई गोरखराव दहिवाळ वय (५०) यांचे दीर्घ आजारपणामुळे मंगळवारी दि,१८ सकाळी अकरा वाजता निधन झाले. त्यांच्यावर संध्याकाळी साडेपाच वाजता अंत्येविधी करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगी मुलगा जावई सून नातवंडे असा मोठा परिवार आहे.त्या लखन दहिवाळ यांच्या मातोश्री होतं

## मोहराळा ग्रामपंचायत कारभाराची चौकशी करून कार्यवाही करा भीम आर्मी भारत एकता मिशनची मागणी



यावल दि.१८ (सुरेश पाटील) तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत मोहराळा येथे सन २०२१ ते २०२३ मध्ये झालेल्या बोगस कामाची चौकशी करून संबंधित सरपंच व ग्रामसेवक यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी यासाठी भीम आर्मी भारत एकता मिशन यावल रावेत प्रचार प्रसार प्रसिद्धी प्रमुख राहुल जयकार यांनी व पदाधिकाऱ्यांनी यावल पंचायत समिती सहाय्यक गट विकास अधिकारी बा.का.पवार यांच्याकडे लेखी निवेदन दिले.भीम आर्मी भारत एकता मिशन तर्फे आयु.गौरव भरत सोनवणे रा. मोहराळा तालुका यावल यांनी यावल पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी बीके पवार यांच्याकडे दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की ग्रामपंचायत मोहराळा ग्रुपग्रामपंचायत कार्यालय यांच्या माध्यमातून सन २०२१ ते २०२३ या वर्षामध्ये १५ वित्त आयोगा अंतर्गत तसेच इतर योजनेमधून जे कामे झाले आहेत. ते सर्व कामे अतिशय निकृष्ट दर्जाचे आहे.त्या सर्व बोगस कामाची चौकशी / ऑडिट करून संबंधित सरपंच व ग्रामसेवक यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. व सदर कामे ज्या कॉन्ट्रॅक्टदारांना देण्यात आली होती.त्यांची सुद्धा चौकशी करून ज्या कॉन्ट्रॅक्टदाराने बोगस व निकृष्ट दर्जाचे कामे केली असतील त्यांचे लायसन्स काळ्या यादी टाकण्यात यावे.. वरील पैकी कोणत्याही प्रकारची चौकशी व कारवाई न झाल्यास भीम आर्मी भारत एकता मिशन या सामाजिक संघटनेकडून तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल याची नोंद घ्यावी.. तसेच वरील दिलेल्या तक्रार अर्ज मध्ये कारवाई न झाल्यास गटविकास अधिकारी यांची मुक संमती आहे. असे समजण्यात येईल व आपल्या विरोधात वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे दाद मागण्यात येईल असे सुद्धा दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे निवेदनावर जिल्हा सचिव फिरोज अब्बास तडवी,राहुल जयकर यांची स्वाक्षरी आहे.

## एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प तळोदा मार्फत सामुहिक वन हक्क कामांना गती

**उत्तर महाराष्ट्र ब्युरो चीफ हमीद तडवी**

नंदुरबार - आज दिनांक १८ मार्च २०२५ रोजी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प तळोदा येथे प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी अनय नावंदर यांच्या अध्यक्षतेखाली तळोदा, अक्कलकुवा आणि अक्राणी या तिन्ही तालुक्यांची सामुहिक तालुका कन्व्हर्जन समितीची ची बैठक आयोजित करण्यात आली होती. अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम २००६, नियम २००८ आणि सुधारित नियम २०१२ च्या अंतर्गत या तिन्ही तालुक्यात एकूण २४३ सामुहिक वन हक्क प्राप्त असून मागील बैठकीत १५१ आराखड्यांना अंतिम मंजुरी देण्यात आली होती. आता पुन्हा एकूण ५० आराखड्यांना तात्पुरती मंजुरी देण्यात आलेली आहे. यामध्ये तळोदा तालुक्यातील ३ गावे, अक्कलकुवा तालुक्यातील १३



गावे आणि अक्राणी तालुक्यातील एकूण ३४ गावांचा समावेश आहे. आदिवासी गावातील स्थलांतर थांबवून त्यांना वर्षभर गावातच रोजगार देण्याच्या उद्देश्याने तसेच आदिवासी उपजीविका बळकट करून त्यांना आर्थिक संसाधने उपलब्ध करून देण्याच्या उद्देश्याने तसेच गावातील कमी झालेले जंगल वाढविण्याच्या उद्देश्याने या गावातील ग्रामसभेने सामुहिक वन हक्क संवर्धन आणि व्यवस्थापन आराखडे तयार करून त्याला मान्यता दिली असून आराखडे प्रकल्प कार्यालय तळोदा येथे मंजुरी साठी सादर केले होते त्यावर आज बैठकीमध्ये वाचन झाले असून आराखड्यात ज्या त्रुट्या आहेत त्या तातडीने वनविभागाणे दुरुस्त करून प्रकल्पाला प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच धरती आबा जनजातीय उत्कर्ष अभियान च्या अनुषंगाने सामुहिक वन हक्क प्राप्त गावांना केंद्र शासनाचा निधी प्राप्त होण्यासाठी एकूण ३० गावांचे अंदाजपत्रक तसेच वैयक्तिक वनपट्टे धारकांना शासनाच्या योजनांचा लाभ देण्यासाठी क्लस्टर डेवलपमेंट प्लान तयार करून प्रकल्पाला सादर करण्याच्या सूचना प्रकल्प अधिकारी यांनी कृषी विभाग आणि वन विभाग यांना दिल्या.

या बैठकीला उपवनसंरक्षक मेवासी वनविभाग लक्ष्मण पाटील, तहसीलदार तळोदा दिपक धिवरे, गटविकास अधिकारी तळोदा के एम पवार, गट विकास अधिकारी अक्राणी मनोज भोसले, सहा. वन संरक्षक एस के पवार, ए. एन. आडे, वनपरिक्षेत्र अधिकारी सी. ए. काठे, अंबिका पाटील, शंतनू सोनवणे, एन एस एखंडे, एस एम रनदिवे, एम. बी. चव्हाण, एम बी शेख, नायब तहसीलदार डी एस निकम, शाखा अभियंता तळोदा, सहाय्यक प्रकल्प अधिकारी देवेंद्र वाणी, सर्व मनरेगा सहाय्यक कार्यक्रम अधिकारी पंचायत समिती व तहसील, लघु पटबंधारे शाखा अभियंता एम वसावे कनिष्ट अभियंता तळोदा, उपअभियंता लघु पाटबंधारे एम नरसाळे , कनिष्ट अभियंता आर सूर्यवंशी, तालुका कृषी अधिकारी एम के पाडवी, विस्तार अधिकारी पंचायत समिती अक्कलकुवा एम पाटील, प्रकल्प समन्वयक अमोल राठोड, कनिष्ट लिपिक गोकुल शिंदे, ग्रामसभा प्रतिनिधी व अशासकीय सदस्य अशोक राऊत, संदीप वळवी, रतिलाल पावरा आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## निवघा बा येथे राशन दुकानराचा मनमानी कारभा..

हदगाव ग्रामीण. /देवानंद महाजन निवघा बा येथील ऐन सणासुदीच्या काळात स्वस्त धान्य दकान बंद असल्याने नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे तरी पण स्वस्त धान्य दुकानदार शासनाच्या जी आर ला बगल देत दुकानदाराच मनमानी कारभार राजरोसपणे सुरू आहे शासन नागरिकांना सांगत आहेत रोज स्वस्त धान्य दुकान चालु राहते आहे

केंद्र सरकारच्या गरिब कल्या
ण योजने अंतर्गत देशातील प्रत्येक नागरिकाला गहू. तांदळ हे पाच वर्षे मोफत असुन देखील निवघा बा येथील स्वस्त धान्य दुकानदार एका ग्राहकापासून मोफत गहू तांदळाचे पैसे घेत आहे आणि त्या मालाची ओरिजनल पावती सुद्धा देत नाही नागरिकांनी विचारणा केली असता सदरील दुकानदार राजेश्वर देशमुख हे उडवडीचे उत्तर देत आहे आम्हाला शासन कोणताही कमिशन किंवा टक्केवारी देत नसून त्या कारणाने प्रत्येक नागरिकांकडून आम्ही मालाचे पैसे घेतो असे सांगून नागरिकाची दिशाभूल करीत आहे तरी शासनाने याकडे तातडीने लक्ष द्यावे

निवघा बाजार येथील स्वस्त धान्य दुकानदार राजेश्वर देशमुख हे नागरिकाकडून नावाच्या सवा पैसे घेत असून नागरिकाची दिवसाढवळ्या पिळवणूक होत आहे याकडे मात्र अन्नपुरवठा विभाग बघ्याची भूमिका घेत आहे अनेक समस्यांना नागरिकांना सामोरे जावे लागत आहे एखाद्या नागरिकाकडे पैसे नसतील तर त्यांना स्वस्त धान्य दुकानदार म** सुद्धा देत नाही अशी तक्रार बऱ्याच गरीब नागरिकांनी केली आहे स्वस्त धान्य दुकानाची नेमप्लेट सुद्धा दुकानाला नसल्यामुळे अनेक नागरिकांना दुकान ओळखू सुद्धा येत नाही दुकानदारांनी शासनाच्या जीआर प्रमाणे दुकान महिन्यामध्ये रोज रोज दुकान चालू पाहिजे इथे असे नसून दुकानदाराच्या मनाने दुकान उघडले जाते दुकानदाराच्या अशा मनमानी कारभारामुळे नागरिक त्रस्त झाले आहे ऐन सरस्वतीच्या दिवसांमध्ये दुकान बंदच आहे





दैनिक **झुंजार जनता**

बुधवार दि. 19 /03/ 2025





# नमो भिकामाई तुम्हा वंदितो मी

स्व.भिकामाई गणेशराव पवार माझ्या आई आम्ही सर्वजण त्यांना माई म्हणायचो.आज माई जाऊन दोन वर्ष पूर्ण झाली.आज माईचे द्वितीय पुण्यस्मरण.त्या निमित्ताने श्री.माऊली वारकरी गुरुकुल आश्रम अनाथालय व गो शाळा तसेच संत ज्ञानेश्वर विद्यालय निल्लोड फाटा यांच्या वतीने आदरणीय माईस विनम्र अभिवादन. प्रत्येक आईचा लेकरं घडविण्यात सिंहाचा वाटा असतो.आई आणि वडील यांनी दिलेल्या संस्कारांवर लेकरांचे भविष्य अवलंबून असते. आमचेही असेच आहे.माझे मूळ गाव लाडसावंगी. माझे वडील श्री. गणेशराव पवार आणि आई भिकामाई पवार या वारकरी परंपरेतल्या. घरात नित्यनेम काकडा, हरिपाठ,भजन, कीर्तन हे नियमित असायचे.आम्ही एकूण सात भावंडे आणि चार बहिणी.घरची परिस्थिती तशी बेताचीच.शेतीतून पिकणारा भाजीपाला आसपासच्या परिसरात भरणाऱ्या बाजारात नेऊन विकायचा त्यातून मिळणाऱ्या कमाईवर घर चालवायचे हा दोघांचाही नित्यक्रम.यातून आम्ही सर्व भावंड त्यांच्याकडून मेहनत आणि कष्टातून कमावलेल्या पैशाचे महत्व समजू शकलो. म्हणून आज प्रत्येकजण स्वतःच्या जीवनात सुखी आहे. कष्ट,आपार मेहनत,आणि भगवंत भक्तीचे ओतप्रोत भरलेले विचार ही आई वडिलांच्या जीवनाची गुरुकिल्ली. हेच विचार त्यांनी आपल्या लेकरांमध्ये पेरले. त्याचे बिजावरोपण झाले.आणि त्याचे फळ म्हणजे मी स्थापन केलेली माऊली वारकरी शिक्षण संस्था,अनाथालय व गो शाळा तसेच आमचे पुतणे आणि माईंचे नातू ह.भ.प सुशांत महाराज पवार यांनी स्थापन केलेली तुकोबाराय वारकरी संस्था ही होय. घरातील एकाने तरी आळंदीत जावून वारकरी शिक्षणाचे धडे घ्यावे आणि पांडुरंगाचे विचार महाराष्ट्रभर पसरावे.हा त्यांचा मानस होता.मी घरातील सर्व भावंडांमध्ये लहान असल्याने मी आळंदीला वारकरी शिक्षणासाठी जावे हा त्यांचा टोकाचा आग्रह.आई वडिलांचा शब्द प्रमाण मानून मी आळंदी गाठली.तेथील जोग महाराज यांच्या संस्थेत मी वारकरी शिक्षणाचे धडे घेतले. तुकोबा,ज्ञानोबा,संत सावता,संत रोहिदास महाराज, संत कान्होपात्रा अशा विविध संतासह ज्ञानेश्वरी,श्रीमद्भागवत गीता,शिव महापुराण,संत तुकाराम गाथा,नाथ चरित्र अशा विविध संत साहित्यासह ग्रंथांचा अभ्यास करण्याचे भाग्य मला मिळाले.वारकरी शिक्षण पूर्ण केल्यानंतर वारकरी शिक्षण संस्था सुरू करावी असा विचार मनात आल्याने निल्लोड फाटा येथे 2007 साली वारकरी शिक्षण संस्थेचे बीज रोवले.पुढे अनंत अडचणींचा सामना करावा लागला. गावोगावी कथा,कीर्तन,प्रवचनाच्या निमित्ताने फिरत असताना समाजातल्या अतीव दुःखाची जाणीव झाली.समाजात प्रतिकूल परिस्थितीत जगणारी कुटुंब,आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्यांची कुटुंब,आर्थिक दृष्ट्या दुर्बल असणारी कुटुंब पाहिली की मन विचलित होवून जायचं.व्यसनाच्या गर्तेत सापडलेली घरातील कर्ती माणसं त्यातून लेकरांची,कुटुंबाची होत असलेली आबाळ हे सारं मनाला सुन्न करून टाकायची.आणि हे सारं सारं मी माईला सांगायचो.माईने हे सारं तिच्या भोवतालच्या जीवनात पाहिलेलं असल्याने माईने अनाथालय सुरू कर असा मानस माझ्यासमोर बोलून दाखविला आणि अनाथालयाची संकल्पना अशा प्रकारे उभी राहिली.



वारकरी शिक्षण संस्था व अनाथालयात सर्वसामान्य कुटुंबातील लेकरांकडून नाममात्र शुल्क घेऊन तर अनाथ आत्महत्याग्रस्त आर्थिक दृष्ट्या दुर्बल पालकांच्या लेकरांना एक वेळेस चा नाश्ता, दोन वेळेचे जेवण, वह्या पुस्तके,पेन,पेन्सिल, शालेय शिक्षण वारकरी शिक्षण संगणक शिक्षण, निवास व्यवस्था हे सर्व मोफत आहे. या उपक्रमाची संकल्पना खरंतर माईची आणि माझे वडील आप्पांची आहे. याचे सर्व श्रेय मी फक्त या दोघांनाच देऊ शकतो. पुढे माई आणि आप्पा वारकरी संस्थेतच राहायला आले. ते येण्याने जणू संस्थेला मंदिराचेच स्वरूप प्राप्त झाले. विद्यार्थ्यांची माई सदैव काळजी घेत. सहन,उत्सव, रूढी परंपरा याची जपवणूक संस्थेमध्ये होऊ लागली. आणि नकळत माझ्या असणाऱ्या माई सर्व लेकरांच्या होऊन गेल्या. संस्थेवर असणारी माईची करडी नजर, त्यांचे स्पष्ट विचार, विद्यार्थ्यांचा स्वयंपाक नीटनेटका आणि घरच्यासारखा व्हावा हा माईचा नेहमीच कटाक्ष. यातून संस्थेतील स्वयंपाक्याना एक प्रकारची शिस्त लागली. कष्टाने पिकवलेल्या अन्नाचा कण न कण किती महत्त्वाचा आहे हे माईंनी आपल्या आचरणातून दाखवून




दिले."तितकेच घ्या ताटात जितके बसते पोटात" असे माई नेहमीच म्हणत असत, लेकरांसोबत माई हरीपाठाला नियमित असायच्या.पावली,फुगडी, टाळ,मृदंग वाजला की माई हरिनामात दंग होऊन जायच्या. खरंतर आज माई जाऊन दोन वर्ष पूर्ण झाली. मात्र असा एकही क्षण नाही की माईची आठवण आल्याशिवाय राहत नाही. माई तुझ्या मायेच्या आणि काळजीच्या छत्रछायेत मी सदैव सुरक्षित होतो. तुझ्या आशीर्वादाने माझ्या प्रत्येक गोष्टीला अर्थ प्राप्त होता. तू माझ्या जीवनाची संजीवनी होतीस तुझ्या अस्तित्वातून जगण्याची प्रेरणा मिळायची. तुझ्या साथीने मी जीवनातील कोणती अडचण पार करायचो. तुझ्या उपस्थितीने माझ्या आयुष्याला सार्थकता मिळायची. माई तुझ्या प्रेमाची ऊर्जा माझ्या जीवनाचा आधार असायची. माई तू माझ्या संकटाची साथीदार आणि माझ्या सुखाची साक्षीदार होती. माई आज तू नाहीस तर माझ आयुष्य एका रिकाम्या पानासारखे झाले आहे. असे असले तरी तुझ्या मायेचा, कर्तुत्वाचा, प्रेरणेचा, मेहनतीचा, भगवंत भक्तीचा कण न कण माझ्या स्मृतीत सजलेला आहे.आजही माई वसल्या आहेत येथील पिंपळ, वडाच्या आणि आंब्याच्या सावलीत.माई आजही सदैव आहेत इथल्या मातीच्या कणा-कणात माझ्यासह संस्थेत शिकत असणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनामनात.प्रिय माई आपणास द्वितीय पुण्यस्मरणाच्या निमित्ताने विनम्र अभिवादन.

आपलाच,

*ह.भ.प रामेश्वर भिकाबाई गणेशराव पवार*

(संस्थापक अध्यक्ष श्री माऊली वारकरी गुरुकुल आश्रम अनाथालय व गोशाळा तथा संत ज्ञानेश्वर विद्यालय निल्लोड फाटा)

*शब्दांकन*

के.बी. जैवाळ

(मुख्याध्यापक संत ज्ञानेश्वर माध्यमिक विद्यालय निल्लोड फाटा)

## सावद्यात जिलानी मिशन तर्फे इफ्तार पार्टी संपन्न

रावेर तालुका ग्रामीण प्रतिनिधी जाकीर तडवी

सावदा :- येथील चांदनी चौक परिसरातील सरकार सादीक शाहा




वली दर्गाच्या समोरील मैदानावर पवित्र रमजान महिन्यात मुस्लिम बांधव रोजे(उपवास)ठेवतात,या निमित्ताने जिलानी मिशन सावदा,लाला गृप तर्फे रोजदारांसाठी भव्य अशी इफ्तार पार्टीचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते.

सदर ठिकाणी शहरातील हिंदू-मुस्लिम बांधवांनी सामोहिक रित्या एकत्र बसून रोजदारांसोबत इफ्तार करू उपावस सोडले.यानंतर येथे विश्व शांतीसाठी प्राथना करण्यात आली.याप्रसंगी माजी नगराध्यक्ष राजेश भाऊ वानखेडे,मुस्लिम समाज प्रमुख जाहिद कारी,सावदा पोलिस ठाण्याचे सपोनि विशाल पाटील,पो.का.निलेश बाविस्कर,पोलिस मयूर पाटील, माजी नगरसेवक फिरोज लेप्टी, चर्मकार सामाज संघटनेचे जिल्हा सचिव गजानन उर्फ गजू ठोसरे,माजी,नगरसेवक फिरोज खान पठाण,पत्रकार दिपक सरावगे,जेष्ठ पत्रकार युसूफ शाह,पत्रकार फरीद शेख,निसार अहमद,कामील मेंबर,माजी.गुड्डू मेंबर,समद गुलाब,शेख नाजीम,शेख कलिम जनाब,शौकत खान,बाबू मुस्लिम यांच्या सह संख्येने रोजदार उपस्थित होते.

सदरची इफ्तार पार्टी यशस्वी करण्यासाठी जिलानी मिशन चे,मोईन लाला,शेख चांद,अलिम शेख,शेख अदनान,जुनैद शेख, मोहसीन,इरफान शेख,सह सदस्यांनी मेहनत घेतली.

द•ख•ल

## पुण्यातील बंदोबस्तात वाढ, सतर्कतेचे आदेश

**पुणे** : नागपूरमधील हिंसाचाराच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर शहर, परिसरात सतर्कतेचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले आहेत. शहरातील बंदोबस्तात वाढ करण्यात आली असून, अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन पोलीस आयुक्तांनी केले आहे. नागपूर शहरातील महाल परिसरात सोमवारी सायंकाळी दोन गटात वाद झाला झाला. वादातून दगडफेक, तसेच वाहने जाळण्याची घटना घडली. त्यानंतर पोलिसांनी ७० जणांना पकडले असून, नागपूरमधील परिस्थिती नियंत्रणाखाली आहे. नागपूरमध्ये उसळलेल्या हिंसाचाराच्या घटनेनंतर शहरात सतर्कतेचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी शहरातील सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रमुखांना दिले. रात्रीपासून शहरातील वेगवेगळ्या भागात बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. संवेदनशील ठिकाणी बंदोबस्त वाढविण्यात आला आहे.

## सिमेंट मिक्सरच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**पुणे** : सिमेंट मिक्सरच्या धडकेत दुचाकीस्वार महाविद्यालयीन तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना लोहगाव परिसरातील डी. वाय पाटील महाविद्यालय रस्त्यावर घडली. स्वप्नील प्रकाश साळवे (वय २२, रा. भालकुंड, जि. परभणी) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वार तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी सिमेंट मिक्सरचालक वेंकट गुरुप्पा पवार (वय ४५, रा. खांदवे निवास, निरगुडी रस्ता, लोहगाव) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत स्वप्नीलचे मामा दिलीप धोडिंबा साबळे (वय ५३, रा. डोंगरे वस्ती, निघोज, चाकण) यांनी विमानतळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

## एसटीची दुचाकीला धडक जेष्ठ व्यक्ती ठार

**निरगुडसर :** मंचर तालुका आंबेगाव गावचे हद्दीत जुना पुणे नाशिक रस्त्यावर एस टी बसने दुचाकीला दिलेल्या धडकेत दुचाकीवरील जेष्ठ व्यक्ती ठार झाली असुन एस टी बस मधील एक महीला जखमी झाली आहे. या प्रकरणी एस. टी बस चालक संदीप जयवंत भागवत ( वय ४२, रा. राजापुर ता. संगमनेर जि. अहमदनगर) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून शैलेश अशोक एरंडे यांनी फिर्याद दाखल केली आहे. या बाबत पोलीसांनी दिलेली माहिती अशी की फिर्यादी शैलेश एरंडे यांचे वडील अशोक किसन एरंडे (वय ६५ रा. थुगाव ता. आंबेगाव) हे त्यांची दुचाकी वरून रविवारी दि. १६ रोजी मंचर गावच्या हद्दीतून जुना पुणे नाशिक हायवे रोड वरून मार्केट यार्ड गेटच्या समोरून जात असताना त्यांचे दुचाकीला संगमनेर आगाराची पुणे संगमनेर एसटी बस क्रमांक एम एच २० जीसी २४४९ या बसले समोरून जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकी वरील अशोक किसन एरंडे यांच्या डोक्याला, उजव्या खाद्याला, पायाला, पोटाला गंभीर मार लागल्याने त्याचा मृत्यू झाला आहे. तर एसटी बसमधील प्रवासी महिला जयवंताबाई जिजाबा तळपे (वय ७५ रा. बोटा ता. संगमनेर जि. अहमदनगर) ही जखमी झाली आहे. याप्रकरणी एसटी बस चालक संदीप भगवंत भागवत याच्यावर मंचर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हवालदार जांभळे करत आहेत.

# ग्राहक दिनास पुन्हा शासकीय अधिकाऱ्यांची दांडी

## महसूल ,पाटबंधारे विभागाच्या तक्रारी

**लिंपणगाव** - श्रीगोंदा तहसील कार्यालयात आयोजित ग्राहक दिनामध्ये ग्राहक दिनाचे विषय सोडून महसूल विभागातील रस्ता केस, तलाठी पाटबंधारे विभागाचे नुकतेच झालेले आवर्तन या विषयावर गाजला, मात्र पंचायत समिती आरोग्य विभाग नगर परिषद आदी अधिकाऱ्यांनी मात्र ग्राहक दिनाच्या कार्यक्रमास दांडी मारल्याचे दिसून आले. १५ मार्च रोजी जागतिक ग्राहक दिन सर्वत्र साजरा करण्यात येतो. त्या पार्श्वभूमीवर श्रीगोंद्याच्या तहसीलदार डॉ क्षितिजा वाघमारे यांच्या सूचनेनुसार १८ मार्च रोजी तहसील कार्यालयामध्ये जागतिक ग्राहक दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या ग्राहक दिनास कुकडी जलसंपदा; महाविद्यालयाचे प्रतिनिधी; परिवहन; वनविभाग; सामाजिक वन विभाग व बांधकाम विभागाचे प्रतिनिधी उपस्थितच होते. मात्र अन्य विभागाचे प्रतिनिधीनी उपस्थित नव्हते.दरम्यान तहसीलदारांनी ग्राहक दिनास उपस्थिती बाबत नोटीस बजावून देखील ग्राहक दिनास अन्य खात्यांचे प्रतिनिधी अनुपस्थित राहिले. त्यांना तात्काळ नोटीस बजावून एक महिनाभर जागतिक ग्राहक दिनाच्या निमित्ताने ज्या तक्रारी ग्राहकांचे आहेत. त्याच कार्यालयात ग्राहक दिन चालू राहील. व त्याचे तात्काळ निराकरण केले जाईल. यासाठी मी जातीने लक्ष घालीन; असे आश्वासन तहसीलदार डॉ. क्षितिजा वाघमारे यांनी दिले. प्रस्ताविकात ग्राहकपंचायतीचे प्रा विजय निंभोरे यांनी संघटना आणि शासन यांच्या समन्वयातून ग्राहकांचे हित याविषयी माहिती विशद केली.प्रारंभी काष्टीचे धनंजय पंडित यांनी तहसील कार्यालयातील जमीन महसूल विभागात संबंधित कर्मचाऱ्यांकडून जमिनीच्या प्रश्नासंदर्भात माहिती घेण्याचा प्रयत्न केला परंतु संबंधितांकडून विसंगत उत्तरे मिळतात. त्यामुळे शेतकऱ्याचा वेळ जातो. यावर तहसीलदार. डॉ क्षितिजा वाघमारे यांनी सांगितले की; तहसील विभागात कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या आहे. त्यामुळे एका कर्मचाऱ्याकडे अनेक विभागांचा पदभार असल्याने कार्यालयीन कामात अडचण निर्माण होते. तरी देखील मी स्वतः ज्या शेतकऱ्यांच्या समस्या आहेत त्या प्रश्नांचा मी तात्काळ पाठपुरावा करेल असे आश्वासन दिले. तर अजित पटवा यांनी शनी चौकात विद्यार्थी व प्रवाशांच्या सोयीसाठी बस स्टॉप असावा ;अशी सूचना मांडली. पत्रकार दत्ताजी जगताप यांनी ग्राहक म्हणून ज्या तक्रारी आहेत. त्या संबंधित महसूल कर्मचाऱ्यांकडून सम ाधानकारक उत्तर मिळावे. याबरोबरच सरस्वती नदी स्वच्छ होण्याची अपेक्षा व्यक्त करत नगरपालिकेच्या पहाटेच्या वेळी घंटागाडीचा आवाज जास्त असतो तो सौम्य असावा अशी भूमिका यावेळी मांडली. वांगदरीचे अनंत पवार यांनी वांगदरी गाव हे मोठ्या लोकसंख्येचे व महसूल क्षेत्रही मोठ्या संख्येचे आहे. परंतु गावात सजेला असणारे तलाठी उपस्थित राहत नाही. काम करताना त्यांनी कार्यालयाचे कुलूपच उघडे ठेवले नसल्याने शेतकरी वर्गांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याच्या भावना यावेळी तहसीलदारांसमोर मांडल्या.

तर ग्राहक पंचायतीचे ॲड रमेश जठार यांनी ग्राहकांचे अधिकार हक्क याबरोबरच जगातील प्रत्येक व्यक्ती ही ग्राहक असते. त्यानुसार ग्राहक संरक्षण कायद्याची पायमल्ली होऊ नये; याविषयी सविस्तर अशी माहिती विशद केली. लिंपणगावचे शेतकरी अशोक वाल्हेकर यांनी कुकडी रब्बी हंगामाचे श्रीगोंद्याच्या१३२ मायनर मधून सोडण्यात आलेले आवर्तन अत्यंत तुटपुंजे असून लिंपणगावचे कुकडी लाभक्षेत्राचे शेतकरी आवर्तनापासून वंचित राहिल्याने पिके जळून गेलेले आहे. कुकडीच्या अधिकाऱ्यांच्या नियोजन शून्य कारभारामुळे शेतकऱ्यांचे कुकडीच्या एका पाण्यापासून मोठे नुकसान झाल्याचा दावा यावेळी श्री वाल्हेकर यांनी तहसीलदार समोर मांडला तर लिंपणगावच्या २५ शेतकऱ्यांचा वहिवाटीचा शेत रस्ता एका शेतकऱ्याने गेल्या दोन महिन्यापासून अडवला तहसीलदारांसमोर या दाव्याची सहा मार्च रोजी सुनावणी झाली. पुढे तात्काळ स्थळ पाहणी करून रस्ता खुला करून देण्याची मागणी अशोक वाल्हेकर व दीपक वाल्हेकर यांनी तहसीलदार समोर तळमळीने मांडली. या ग्राहक दिनास ज्येष्ठ पत्रकार व ग्राहक जनजागृती मंचाचे कार्याध्यक्ष नंदकुमार कुरुमकर; ग्राहकपंचायतचे प्रा. विजय निंभोरे; अनंत पवार; संतोष रोडे; ॲड. संदीप भोयटे; ॲड. रमेश जठार; श्रीरंग साळवे; पत्रकार पिटर रणसिंग; पत्रकार शिवाजी साळुंखे; दीपक वाल्हेकर; अशोक वाल्हेकर; आदींसह पुरवठा निरीक्षक अधिकारी ज्ञानेश कोरे; पुरवठा निरीक्षक प्रज्ञा थोरात; ऑपरेटर अक्षय शेंडगे; ग्राहकपंचायतीचे पदाधिकारी व ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार पत्रकार दत्ताजी जगताप यांनी मानले.

## जनता गॅरेज संघाने पटकावला सोनईचा नामदार चषक

**सोनई** : मुळा कारखान्याच्या मैदानावर झालेल्या नामदार चषक क्रिकेट स्पर्धेत नेवासा येथील जनता गॅरेज संघाने विजेतेपद पटकावले. उदयन गडाख युवा मंच, यश ग्रुप, गुड मॉर्निंग क्रिकेट क्लब यांच्या वतीने उदयन गडाख यांच्या वाढदिवसानिमित्त ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

यामध्ये नेवासा तालुक्यातील १२ क्रिकेट संघ सहभागी झाले होते. दररोज होणारे सामने पाहण्यासाठी नेवासा तालुक्यातील गावागावातून तरुण व क्रिकेटप्रेमी उपस्थित होते. जनता गॅरेज नेवासा व नेवासा ब्लास्टर्स यांच्यामध्ये झालेल्या अंतिम सामन्यात नेवासा ब्लास्टर्स संघाने प्रथम फलंदाजी करताना ६ षटकात ४४ धावा काढल्या तर जनता गॅरेज संघाने सात गडी राखून ३.४ षटकात विजय मिळवला. त्यांना प्रथम क्रमांकाचे ५५ हजार ५५५ रुपयांचे बक्षीस देण्यात आले.

द्वितीय क्रमांकाचे नेवासा ब्लास्टर्ससला ३५ हजार ५५५, तृतीय क्रमांकाचे संघर्ष कांगोणी २५ हजार ५५५ रु बक्षीस व चतुर्थ क्रमांचे १५ हजार ५५५ बक्षीस पवार ईलेव्हन संघाने पटकावले. या स्पर्धेतील उत्कृष्ट फलंदाज म्हणून शुभम ताके, उत्कृष्ट गोलंदाज म्हणून पापा शेख व मॅन ऑफ द सिरीज म्हणून अमन शेख यांचा स्मृतिचिन्ह व बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मेहनत घेणाऱ्यांचे उदयन गडाख युवा मंचच्या वतीने ट्रॉफी व कवडसे पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला. आभार उदय पालवे यांनी मानले.

## श्रीगोंद्यात हरणाची शिकार ? हरणाचे मांस खाल्ल्याची वनविभागाकडे तक्रार, चौकशी सुरु

**श्रीगोंदा** : तालुक्यातील औटेवाडी परिसरात हरणाची शिकार करून त्याचे मांस खाल्ल्याची तक्रार एका सूज्ञ नागरिकाने वनविभागाकडे केली होती. तक्रारीनुसार वनविभागाचे अधिकाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन नमुने ताब्यात घेऊन तपासणीसाठी पाठवले आहेत. त्याचा अहवाल आल्यावर रीतसर गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याची माहिती वनविभागाने दिली आहे . श्रीगोंद्यातील औटेवाडी परिसरात हरीण या वन्य प्राण्याची शिकार करून त्याच्या मटणाची पार्टी करत असल्याची माहिती परिसरातील सूज्ञ नागरिकांनी वनविभागाच्या अधिकाऱ्यांना दिली असता वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. जंगलातून येणाऱ्या चारीजवळ पडक्या वखारीत मटण शिजत असल्याचे त्यांना सापडले अधिकाऱ्यांनी सापडलेले नमुने पंचनामा करुन पुढील तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. औटेवाडी परिसरात काही व्यक्ती हरणाचे मांस खात असल्याची तक्रार बुधवारी (ता.१२ मार्च ) वनविभागाकडे करण्यात आली. अधिकाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन तपास केला. घटनास्थळावर हाडे आढळून आले. सापडलेला मुद्देमाल ताब्यात घेऊन पंचनामा करण्यात आला. वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी त्या परिसरात शोध घेतला, परंतु, अन्य कसलेही अवशेष आढळून आले नाहीत. वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) दिपाली भगत, वन्यजीव विभागाचे संकेत उगले यांच्यासह वनविभागाचे कर्मचारी घटनास्थळी होते. ताब्यात घेतलेले हाडांचे नमुने तपासणीसाठी नागपूर येथील प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. अहवालानंतरच ती हाडे कोणत्या प्राण्याची आहेत हे उघड होणार आहे. आम्ही हरणाची शिकार करून नव्हे तर मटण आणून ते खात असल्याचा जबाब स्थानिक रहिवाशांनी वनविभागाकडे दिला आहे.

### अहवालानंतर गुन्हा दाखल होणार - वनपाल

औटेवाडी परिसरात घटनास्थळी आढळलेल्या हाडांचे नमुन्यांची तपासणी करून त्याचा अहवाल प्राप्त झाल्यावर नंतरच हि हाडे कोणत्या जनावरांची आहेत हे सिद्ध होईल जर हि हाडे हरणाची आढळून आल्यावरच त्याच्यावर कायदेशीर कायवाह होईल अशी माहिती विजया मोरे(वनपाल वनविभाग श्रीगोंदा)यांनी दिली आहे

### मांस खाणारे पण आरोपी होणार ?

श्रीगोंदा शहराच्या नजीक हरणाची शिकार करून त्याच्या जोरदार पार्ट्या होत असल्याची माहिती मिळाली असून त्यामध्ये अनेक दिग्गज, राजकीय नेते मटण खाण्यासाठी एकत्र येत असल्याची माहिती मिळाली असून प्रशासन त्याच्यावरही कारवाई करणार का ? असं प्रश्न उपस्थित केला जात आहे .

## शेअर्स मार्केटमध्ये कोट्यवधींना गंडवणारा कवडे गजाआड स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**शेवगाव:** तालुक्यातील अनेक गुंतवणूकदारांना शेअर्स मार्केटमध्ये कोट्यवधी रुपयांचा गंडा घालून फरार झालेला आरोपी साईनाथ कल्याण कवडे (वय २८, रा. कुरूडगाव, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर) याला पोलिसांनी अखेर जेरबंद केले आहे.स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला गुजरात येथे बेड्या ठोकल्या. फसवणूक करून गुन्हा दाखल होण्यापूर्वीच कवडे फरार झाला होता. अखेर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या. फिर्यादी अवधूत विनायक केदार (रा. खंडोबानगर, शेवगाव, ता. शेवगाव) यांना आरोपी साईनाथ कवडे याने त्याच्या ॲसिटेक सोल्युशन ट्रेडिंग कंपनीमध्ये पैसे गुंतविण्यास सांगितले. त्यासाठी त्याने गुंतवणुकीच्या रकमेवर दरमहा १२ टक्के परतावा देण्याचे आमीष दाखविले. या अमिषाला बळी पडून फिर्यादी व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी, तसेच परिसरातील इतर पाच जणांनी वेळोवेळी ॲसिटेक सोल्युशन ट्रेडिंग कंपनीमध्ये एक कोटी ६१ लाख ४२ हजार ९०० रुपये गुंतविले. आरोपीने कवडे याने गुंतवणुकीच्या रकमेचा परतावा न देता, तसेच गुंतवणूक केलेली रक्कम न देता आर्थिक फसवणूक करून पोबारा गेला. याबाबत शेवगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान, गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पोलिस अधीक्षक राकेश ओला यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक दिनेश आहेर यांना समांतर तपासाचे आदेश दिले. त्यानुसार आहेर यांनी त्यांच्यापथकासह तपास सुरू केला. दरम्यान, फसवणुकीच्या या गुन्ह्याचे तांत्रिक विश्लेषण करूनपान ४ वर आरोपीचा शोध घेण्यात आला असता, तो गुजरातधील सूरत या ठिकाणी असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने सूरत येथे जाऊन आरोपी कवडे याला ताब्यात घेतले. आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अनंत सालगुडे व पोलिस अंमलदार संतोष लोढे, शिवाजी ढाकणे, बाळासाहेब गुंजाळ, फुरकान शेख, प्रशांत राठोड व ज्योती शिंदे यांच्या पथकाने ही कारवाई केली. आरोपी कवडे हा फरार झाल्यापासून सातत्याने राहण्याचे ठिकाण व मोबाईल बदलत होता. त्यामुळे त्याचा शोध घेण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर होते. त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्याने त्याच्या मालकीची महिंद्रा कंपनीची कार किशोर शिवाजी जाधव (रा. तिसगाव, ता. पाथर्डी) याला दिल्याची माहिती दिली. त्यानुसार पथकाने पंचासमक्ष किशोर जाधव यांनी हजर केलेली दीड लाख रुपये किमतीची कार जप्त करण्यात आली आहे. पुढील तपासासाठी आरोपीला शेवगाव पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

द • ख • ल

## बेवारस व अपघातातील गाड्या मुळ मालकांनी हस्तगत कराव्यात ओतूर पोलिसांचे आवाहन

**आळेफाटा (प्रतिनिधी )** कल्याण अहिल्यानगर महामार्गांवरिल ओतूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत झालेल्या अपघातग्रस्त दुचाकी तसेच गहाळ झालेल्या आणि चोरी प्रकरणात सापडलेल्या बेवारस दुचाकी पोलिस स्टेशनचे आवारात अनेक वर्ष पडून आहेत. त्या दुचाकींच्या मूळ मालकांनी आपापल्या दुचाकीची कागदपत्रे घेऊन येऊन व गाडीची खातरजमा करून आपल्या दुचाकी आपल्या ताब्यात घ्याव्यात अन्यथा येत्या काही दिवसात पोलिस स्टेशनचे ताब्यात असलेल्या सर्व दुचाकी गाड्यांचा लिलाव करण्यात येणार असल्याची माहिती ओतूर पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक लहू थाटे यांनी दिली आहे.सदर उर्वरित गाड्यांचा कायदेशीररीत्या लिलाव होऊन गेल्या नंतर कोणतीही हरकत मान्य केली जाणार नसल्यामुळे गाडी मालकांनी तात्काळ आपल्या गाडीची खात्री करून आपली दुचाकी ताब्यात घ्यावी असे आवाहन ओतूर पोलिस स्टेशनच्या वतीने करण्यात आले आहे.



## मराठ्यांच्या शौर्याचे स्मारक उभारावे : खा. डॉ. अमोल कोल्हे

**नारायणगाव :** औरंगजेबाची कबर म्हणजे मराठ्यांच्या असीम शौर्याचे प्रतिक असून केंद्र आणि महाराष्ट्म्र सरकारने या ठिकाणी ‘मराठ्यांच्या शौर्याचे स्मारक’ उभारावे अशी मागणी खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी केली. त्याबरोबर कुणाचीही राजकीय पोळी भाजण्यासाठी स्वतःच्या आयुष्याची होळी होऊ देऊ नका, असे आवाहनही त्यांनी तरुणाईला केले. गेल्या काही दिवसांपासून औरंगजेबाच्या कबरीवरून राज्यातील वातावरण तापले आहे. त्यात अनेक राजकीय नेत्यांनी केलेल्या वक्तव्यामुळे वातावरण कलुषित होत आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी औरंग्याच्या कबरीचे उदात्तीकरण होऊ नये या भूमिकेशी सहमती दर्शवताना खासदार डॉ. कोल्हे यांनी जो कुणी महाराष्ट्राकडे वाकड्या नजरेने बघेल त्याची अवस्था ‘हीच’ होईल, हे दाखवून देणारी ही कबर आहे, असे ठासून सांगितले. छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्य धुळीस मिळविण्यासाठी आलेल्या औरंग्याला इथेच मूठमाती दिली. त्याचे प्रतिक ही कबर आहे. म्हणूनच ‘मराठ्यांच्या शौर्याचे स्मारक’ या ठिकाणी उभारण्याची मागणी खासदार डॉ. कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून केली आहे.

## मलठण सोसायटीच्या अध्यक्षपदी हरिश्चंद्र गायकवाड

**प्रतिनिधी / राष्ट्र सह्याद्री**

पाबळ मलठण(ता.शिरूर) येथील मलठण विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या अध्यक्षपदी हरिश्चंद्र उर्फ योगेश सुरेश गायकवाड यांची बिनविरोध निवड झाली. अलका कोठावळे यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर हे पद रिक्त होते. संस्थेच्या कार्यालयात अध्यक्षपदाच्या निवडीचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी हरिश्चंद्र गायकवाड यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी ए.एच धायगुडे यांनी जाहीर केले.दरम्यान, सर्व संचालक मंडळाच्या उपस्थितीत मलठण सोसायटीच्या कार्यालयात संस्थेच्या अध्यक्षपदाच्या निवडीचा कार्यक्रम झाला. यावेळी योगेश गायकवाड यांची बिनविरोध निवड झाली. यावेळी पंचायत समिती सदस्य, सुभाष पोकळे, टाकळी हाजी गावचे सरपंच दामू घोडे, घोडगंगा कारखाना संचालक सुहास थोरात, प्रा.अनिल शिंदे, मा.सरपंच शशिआण्णा वाव्हळ,मा. चेअरमन दत्तात्रय गायकवाड,सुरेश गायकवाड, सुदाम गायकवाड,मा. उपसरपंच रामभाऊ गायकवाड, उदयोजक सागर दंडवते, गणेश जामदार, यांनी



यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी संस्थेचे व्हॉइस, चेअरमन साळभाऊ शिंदे, संचालक, नाना फुलसुंदर, सुभाष दंडवते, महादू गायकवाड, सुभाष सोनवणे, शरद दंडवते, बिरा शिंदे आदी उपस्थित होते.

## नंदुरबारच्या तळोद्यात युवा क्रांतीचा राज्यस्तरीय मेळावा संपन्न

**कवठे येमाई :** युवा क्रांती फाउंडेशन अंतर्गत पोलीस मित्र,ग्राहक,पत्रकार संरक्षण,माहिती अधिकार व किसान विकास मंच,भारत चा राज्यस्तरीय मेळावा नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला,या कार्यक्रमाचे तळोदा टीमने उत्कृष्ट आयोजन केले होते.तर संघटनेच्या माध्यमातून व ध्येय धोरणानुसार सामाजिक क्षेत्रात सर्वांनी मिळून अधिक प्रभावीपणे संघटन व कार्य करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविंद्र सूर्यवंशी हे होते.यावेळी राज्यासह मध्यप्रदेश,गुजरात राज्यातून संघटनेचे सुमारे पाचशे पदाधिकारी,सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमात विविध पदाधिकाऱ्यांनी आपली सामाजिक कार्ये मांडत संघटनेच्या माध्यमातून गौरवच होत असल्याचे सांगितले.यावेळी संघटनेत उत्कृष्ट संघटन व सामाजिक कार्य करणाऱ्या महिला,पुरुष पदाधिकाऱ्यांचा शाल,श्रीफळ,ट्रॉफी,सन्मानपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला तर विविध पदाधिकाऱ्यांना त्यांच्या गौरवशाली कार्याबाबद्दल पदोन्नती देण्यात आली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक संघटनेचे राष्ट्रीय संघटक डॉ. राजेश्वर हेंद्रे यांनी प्रभावीपणे केले तर तळोदा टीमच्या वतीने हरीश पाटील यांनी मानले.

# १३ दिवसांत २०४ कोटी वसुलीचे महावितरणचे ‘टार्गेट’



**बारामती :** आर्थिक वर्ष संपण्यास अवघे १३ दिवस उरले असून, या तेरा दिवसांत २०४ कोटी रुपये वसुलीचे टार्गेट महावितरणने ठेवले आहे. प्रत्येक अभियंता, लाईनमन यांना हे उद्दिष्ट (टार्गेट) विभागून देण्यात आले असून, वसुलीसाठी वीजपुरवठा खंडित करण्याचे आदेश सर्व कर्मचाऱ्यांना देण्यात आले आहेत.गैरसोय टाळण्यासाठी ग्राहकांनी थकबाकीसह चालू वीजबिल तातडीने भरुन महावितरणला सहकार्य करावे, असे आवाहन महावितरण बारामती परिमंडलाचे मुख्य अभियंता धर्मराज पेठकर यांनी केले आहे.ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा देण्यासाठी महावितरण कायम प्रयत्नशील असते. अखंडित वीज पुरविणे जशी महावितरणची जबाबदारी आहे. तसे वापरलेल्या विजेचे बिल वेळत भरणे ही ग्राहकांची देखील जबाबदारी आहे. परंतु, काही ग्राहक त्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे महावितरणला वीजबिल वसुलीसाठी वीजपुरवठा खंडित करण्याची कटू कारवाई करावी लागते.बारामती परिमंडलात लघुदाब वर्गवारीतील घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक व इतर ग्राहकांकडे सुमारे ११२ कोटींची थकबाकी आहे. तर चालू महिन्याची मागणी २५७.५३ कोटी असे मिळून मार्च महिन्यात बारामती परिमंडलास ३६९.४६ कोटी वसुलीचे उद्दिष्ट सांघिक कार्यालयाकडून देण्यात आले आहे. १८ दिवसांत केवळ १६६ कोटी रुपये वसूल झाले असून हे प्रमाण एकूण उद्दिष्टाच्या ४४.९३ टक्के इतकेच आहे. त्यामुळे उरलेल्या १३ दिवसांत वसुलीचा वेग वाढवावा लागणार असून, कोणत्याही परिस्थितीत २०४ कोटी रुपये वसुलीचे लक्ष गाठणार असल्याचे पेठकर यांनी सांगितले. त्यासाठी दैनंदिन वसुलीवर लक्ष ठेवण्यासाठी विभागनिहाय पथके सुद्धा तयार केली आहेत. रोहित्रांची जबाबदारी वीज कर्मचाऱ्यांना नेमून दिलेली असते. परिमंडलातील सर्व वीज कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अखत्यारित रोहित्रावरील सर्व ग्राहकांचे वीजबिल वसूल करुन थकबाकी शून्य करावी,असे निर्देश सर्वांना दिले असल्याचे मुख्य अभियंता धर्मराज पेठकर यांनी सांगितले.

# एसटीची दुचाकीला धडक जेष्ठ व्यक्ती ठार

**निरगुडसर** ममंचर तालुका आंबेगाव गावचे हद्दीत जुना पुणे नाशिक रस्त्यावर एस टी बसने दुचाकीला दिलेल्या धडकेत दुचाकीवरील जेष्ठ व्यक्ती ठार झाली असुन एस टी बस मधील एक महीला जखमी झाली आहे. या प्रकरणी एस. टी बस चालक संदीप जयवंत भागवत ( वय ४२, रा. राजापुर ता. संगमनेर जि. अहमदनगर) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून शैलेश अशोक एरंडे यांनी फिर्याद दाखल केली आहे. या बाबत पोलीसांनी दिलेली माहिती अशी की फिर्यादी शैलेश एरंडे यांचे वडील अशोक किसन एरंडे (वय ६५ रा. थुगाव ता. आंबेगाव) हे त्यांची दुचाकी वरून रविवारी दि. १६ रोजी मंचर गावच्या हद्दीतून जुना पुणे नाशिक हायवे रोड वरून मार्केट यार्ड गेटच्या समोरून जात असताना त्यांचे दुचाकीला संगमनेर आगाराची पुणे संगमनेर एसटी बस क्रमांक एम एच २० जीसी २४४९ या बसले समोरून जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकी वरील अशोक किसन एरंडे यांच्या डोक्याला, उजव्या खाद्याला, पायाला, पोटाला गंभीर मार लागल्याने त्याचा मृत्यू झाला आहे. तर एसटी बसमधील प्रवासी महिला जयवंताबाई जिजाबा तळपे (वय ७५ रा. बोटा ता. संगमनेर जि. अहमदनगर) ही जखमी झाली आहे. याप्रकरणी एसटी बस चालक संदीप भगवंत भागवत याच्यावर मंचर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हवालदार जांभळे करत आहेत.



अशोक किसन एरंडे

# मंचर आगारासाठी सुसज्ज बस व इतर सुविधा मिळाव्या : मागणी

**मंचर** - मंचर, तांबडेमळा ता. आंबेगाव येथे काही महिन्यांपूर्वी सुरू झालेल्या एसटी बस आगारात अनेक बस जुन्या असून या आगारास सुसज्ज बस मिळाव्यात तसेच इतर सुविधांमध्ये सुधारणा व्हावी अशी मागणी माजी सहकार मंत्री व आंबेगाव तालुक्याचे विद्यमान आमदार दिलीप वळसे पाटील यांनी केली आहे. याबाबत त्यानी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे. आंबेगाव तालुक्यातील नागरिकांच्या वाढत्या प्रवासाच्या गरजा लक्षात घेता,



मंचर (तांबडेमळा) येथे सुरु झालेल्या बस आगाराच्या सुविधांमध्ये तातडीने सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. सध्या या बसआगारातून १८ बसमार्फत ४३ फेऱ्या चालवल्या जात असल्या तरी, आदिवासी व डोंगरी भागातील नागरिक, विद्यार्थी आणि प्रवाशांना मोठ्या प्रमाणावर गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. भीमाशंकर आणि आहुपे या महत्त्वाच्या भागांसाठी प्रवास सुलभ करण्यासाठी अधिक बस उपलब्ध होणे अत्यंत गरजेचे आहे. त्याचप्रमाणे, या आगारात अद्याप डिझेल पंप कार्यान्वित नाही, ज्यामुळे बसेसना ४० कि.मी.चा अतिरिक्त फेरा करावा लागतो. यामुळे इंधन व वेळेचा अपव्यय होत आहे. तसेच, लिपिक, सहाय्यक वाहतूक निरीक्षक, सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक आणि इतर तांत्रिक पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत, ज्यामुळे प्रशासनावर ताण निर्माण झाला आहे. शासनाने तात्काळ मंचर बसआगारासाठी ३०-३५ नवीन बस तातडीने उपलब्ध करून द्याव्यात, बस आगाराचे व्यवस्थापन सुरळीत व्हावे यासाठी रिक्त पदे त्वरित भरावीत, तसेच आगारात डिझेल पंप कार्यान्वित करून बस सेवेसाठी इंधन पुरवठा सोयीस्कर करावा अश्या मागण्या करण्यात आल्या आहेत. दरम्यान या सुविधांमुळे स्थानिक प्रवाशांचे दैनंदिन आयुष्य, विद्यार्थ्यांचे शिक्षण, आंबेगाव तालुक्यातील दळणवळण अधिक सक्षम होईल. शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा अशी मागणी पत्राद्वरे करण्यात आली आहे.

# उरुळी कांचन मध्ये पहिल्यांदाच झालं भिर्र श्री काळभैरवनाथाच्या यात्रा महोत्सवाला सुरुवात

**उरुळी कांचन :** सालाबाद प्रमाणे उरुळी कांचन येथील ग्रामदैवत श्री काळभैरवनाथाचा उत्सव ( यात्रा ) शनिवार दिनांक २२ मार्च २०२५ पासून पहिल्यांदाच भरविलेल्या भव्य दिव्य अशा बैलगाडा शर्यतीने सुरू झाला. या बैलगाडा स्पर्धेत सुमारे ४४५ बैलगाडा मालकांनी भाग घेतला होता, यापैकी सात बैलगाडा मालकांना रोख रकमेच्या बक्षिसाने आणि सन्मानचिन्हाने सन्मानित करीत उरुळी कांचन केसरी पर्व १ या उरुळी कांचन मधील पहिल्याच आ बाहुल्या बाजी फॅन्स क्लब उरुळी कांचन आयोजित बैलगाडा शर्यतीचा समारोप झाला. पहिले रोख १ लाख रुपयांचे बक्षीस जयश्री बाळासाहेब गोळे शिरगावकर, मुळशी. दुसरे रोख ७० हजार रुपये रकमेचे बक्षीस ऋतुजा गोरख मांगडे, कात्रज पुणे. तिसरे रोख ५० हजार रुपयांचे बक्षीस भूषणभाऊ रानवडे पाटील, चिपळूण, रत्नागिरी. चौथे रोख ४० हजार रुपयांचे बक्षीस सिद्धार्थ सतीश जगताप, अष्टापुर (जगतापवाडी). पाचवे रोख ३० हजार रुपये रकमेचे बक्षीस मयूर खेडेकर व गोकुळ मोडक, वडकी. सहावे रोख २० हजार रुपये रकमेचे बक्षीस महेश मालपोटे, संतोष शेडगे, कैलास शिंदे, मावळ. सातवे रोख १५ हजार रुपये रकमेचे बक्षीस स्वरा विकास गायकवाड, करंजेपूल यांनी पटकावले.बक्षीस



वितरण समारंभाला श्री काळभैरवनाथ उत्सव समितीचे अध्यक्ष राजाराम कांचन, कार्याध्यक्ष महादेव कांचन, खजिनदार लक्ष्मण जगताप, उत्सव प्रमुख प्रसाद कांचन, कार्याध्यक्ष स्वप्निल कांचन, उपाध्यक्ष प्रताप कांचन, सचिव सुनील तांबे, खजिनदार सचिन कांचन यांच्यासह सेवा समितीचे सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.मंगळवारी उत्सवानिमित्त काळ भैरवनाथाला अभिषेक, मॅरेथॉन स्पर्धा, भजन स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, पालखी मिरवणुकीचा छबिना आणि ढोल लेझीम पथकांच्या स्पर्धा होऊन उत्सव संपन्न होणार असून, बुधवारी निकाली कुस्तीच्या फडाने या यात्रेचा समारोप होणार आहे.

यात्रेनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम म्हणून महात्मा गांधी विद्यालयाच्या भव्य खुल्या रंगमंचावर सोमवारी लावण्यांचा ‘‘धुमधडाका अर्थात गावरान मेवा‘‘ हा कार्यक्रम तर बुधवारी ‘‘आबाकी आयेगी बारात‘‘ हे हास्य जत्रा प्रेम प्रभाकर मोरे यांचे धमाल विनोदी नाटक सादर केले जाणार आहे.

# शरदचंद्र पवार साहेब अभ्यासिकेसाठी शिर्डी संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची देणगी




**निघोज :** शिर्डी संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्षनाथ गाडीलकर यांनी रविवार दि.१६ रोजी निघोज येथील शरदचंद्रजी पवार साहेब अभ्यासिकेला भेट दिली तसेच यावेळी त्यांनी या ठिकाणी असलेल्या विद्यार्थ्यांना पुस्तके घेण्यासाठी पाच हजार रुपये देणगी दिली तसेच आपण या ठिकाणी पुन्हा आल्यानंतर विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षेचा अभ्यास करता यावा यासाठी उपयुक्त पुस्तके आणण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे.

यावेळी त्यांचा मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे कोषाध्यक्ष अमृताशेठ रसाळ,संघटक रामदासशेठ वरखडे, विश्वस्त शंकरराव लामखडे, बबनराव ससाणे, विश्वस्त व ग्रामपंचायतीच्या माजी सदस्या आशाताई वरखडे , जी एस महानगर बँकेचे सेवानिवृत्त अधिकारी भगवान पांढरकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. गाडीलकर साहेब यावेळी म्हणाले मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टने लोकपयोगी उपक्रम सुरू केले असून अभ्यासिकेच्या माध्यमातून या ठिकाणी स्पर्धा परीक्षेसाठी पात्र असणाऱ्या शेकडो विद्यार्थ्यांना याचा फायदा मिळणार आहे. निघोज आणी परिसरात शैक्षणिक संस्कृतीला चालना देण्यासाठी संस्थेचे संस्थापक बाबासाहेब कवाद यांनी महत्वपूर्ण योगदान दिले आहे. संस्थेचे पदाधिकारी व विश्वस्त मंडळ यांनी अतिशय चांगले निर्णय घेऊन सर्वसामान्य जनतेला आधार मिळेल अशा पद्धतीने प्रसादालय सुरू केले आहे.

आज शेकडो लोक त्याठिकाणी लाभ घेत आहेत हाच सेवाभाव महत्वपूर्ण असून राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीचा महिमा अगाध असून मातेच्या आशिर्वादाने निघोज भुमी सुजलाम सुफलाम झाली असून अभ्यासिकेसाठी आपण सातत्याने सहकार्य करणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली आहे. ट्रस्टचे कोषाध्यक्ष अमृताशेठ रसाळ यांनी सांगितले की गाडीलकर साहेब यांनी अभ्यासिकेला भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. अतिशय प्राप्त परिस्थितीत गाडीलकर साहेब हे राज्य सरकारच्या सेवेत रुजू होऊन वरिष्ठ अधिकारी पदापर्यंत पोहोचले आहेत हा तालुक्यातील जनतेच्या दृष्टीने अभिमानाची बाब आहे. शिर्डी संस्थानचा विकास होण्यासाठी गाडीलकर साहेब यांचे योगदान मोठे असून तालुक्यातील विकासकामे मार्गी लावण्यासाठी त्यांचा सहभाग महत्वपूर्ण असून अशाप्रकारे गाडीलकर साहेब यांनी सातत्याने मळगंगा ग्रामीण ट्रस्टला मार्गदर्शन करावे असे आवाहन रसाळ यांनी केले आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वस्त शंकरराव लामखडे यांनी केले शेवटी बबनराव ससाणे यांनी आभार मानले.

# प्रस्ताव देऊ नाही टँकर न मिळाल्याने निपाणी जळगाव येथे पाणीटंचाई

**पाथर्डी:** टँकर मिळावे असा तालुक्यात सर्वात आधी प्रस्ताव दाखल करूनही अद्याप पर्यंत प्रस्ताव मंजूर न झाल्याने तालुक्यातील निपाणी जळगाव येथे तीव्र पाणीटंचाई निर्माण होऊन विकतचे पाणी घेण्याची वेळ ग्रामस्थांवर आली आहे. निपाणी जळगावची लोकसंख्या अडीच हजारच्या आसपास असून गावात असलेल्या एका सार्वजनिक विहिरीतून संपूर्ण गावाला पाणीपुरवठा केला जातो मात्र सध्या ही विहीर कोरडी पडल्याने पाण्यासाठी दाहीदिशा म्हणण्याची वेळ ग्रामस्थांवर आली आहे.पंचवीस हजार क्षमतेचे दोन टँकर मिळावे असा प्रस्ताव निपाणी जळगाव च्या ग्रामपंचायतीने प्रशासनाला मागील महिन्याचा दहा तारखेला दाखल केला होता मात्र हा प्रस्ताव सुधारित करून पाठवा असे प्रशासनाने सुचवल्याने पुन्हा एकदा २७ फेब्रु. ला फेरप्रस्ताव निपाणी जळगाव ग्रामपंचायतीने सादर केला मात्र अद्यापही हा प्रस्ताव मंजूर नसल्याने पुढे काय असा प्रश्न ग्रामस्थांना पडला आहे. दोन दिवसांपूर्वी प्रताप ढाकणे यांनी घेतलेल्या टंचाई आढावा बैठकीत निपाणी जळगाव चे ग्रामपंचायत सदस्य चंद्रकांत बोर्डे यांनी सुद्धा आमच्या गावाला तातडीने टँकर सुरु करा अशी मागणी ढाकणे यांच्याकडे केली होती तर या संदर्भात बोलताना ग्रामस्थ अभिजित गर्जे म्हणाले की,सध्या आम्हाला पाचशे लिटरच्या टाकीला दोनशे रुपये मोजावे लागत आहे. उन्हाळ्यचा सुरवातीलाच अशी परिस्थिती असल्याने पुढे काय असा प्रश्न आम्हाला पडला आहे. दोन वेळेस टँकर मिळावे असा प्रस्ताव सादर करूनही अद्यापही टँकर सुरु झाले नसल्याने तातडीने टँकर सुरु करावे अन्यथा आंदोलना शिवाय आम्हाला पर्याय नाही.



# डॉक्टरचे अपहरण करत खुनाचा प्रयत्न करणाऱ्या फरार आरोपीस अटक

## गावठी पिस्तुल व दोन जिवंत काडतुसे जप्त

**निरगुडसर** अपहरण करत खुनाचा प्रयत्न करणाऱ्या फरार कुख्यात सराईत गुन्हेगारास जेरबंद करण्यात स्थानीक गुन्हे शाखेला यश आले असून पोलीसांनी त्याचेकडून एक गावठी पिस्तुल व दोन जिवंत काडतूस हस्तगत केली आहेत. प्रविण ऊर्फ डॉलर सिताराम ओव्हाळ, (वय ३२ वर्षे, रा. वाळद ता. खेड) असे अटक आरोपीचे नाव आहे. मंचर ता. आंबेगाव येथील डॉक्टरचे अपहरण करून त्यांना जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करत खंडणी मागितल्या प्रकरणी मंचर पोलीस ठाण्यात दि. ४/१/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयातील डॉक्टर कैलास रघुनाथ काळे रा. मंचर, ता. आंबेगाव, हे त्यांचेकडील मोटार सायकलवरून पेठ ते मंचर असे जात अतसाना आरोपींनी त्यांच्या चारचाकी वाहनाची मोटार सायकलला धडक देवून डॉक्टरांना खाली पाडले व त्यांचे अपहरण करून त्यांना निघोटवाडी परिसरात नेवून जबर मारहाण करून २० लाख रूपये खंडणीची मागणी केली. त्यातील एक लाख रूपये खंडणीची रक्कम घेवून आरोपी पैकी एकाने डॉक्टरांना जीवे मारण्याचे उद्देशाने गावठी पिस्तुलमधून गोळी फायर केली व त्यानंतर डॉक्टरांना पुणे-नाशिक हायवे रोडचे कडेला पेठ घाटाचे जवळ सोडून दिले होते. सदरचा गुन्हात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने यातील मुख्य आरोपी पवन सुधीर थोरात ( रा. मंचर ता. आंबेगाव ) यास अटक केली होती. तर दुसरा आरोपी प्रविण ऊर्फ डॉलर सिताराम ओव्हाळ हा गुन्हा घडलेपासून फरार होता. सदरचा आरोपी याचेवर खून, खूनाचा प्रयत्न, दरोडा, आर्म अॅक्ट या सारखे गुन्हे दाखल असल्याने पोलीस त्याचा शोध घेत होते. सदरचा आरोपी हा आळेफाटा एस.टी. स्टँड परिसरात येणार असल्याची माहिती स्था.गु.शा.चे पो.कॉ. अक्षय नवले यांना मिळाली होती, त्या माहितीचे आधारे दि.१५ मार्च रोजी आळेफाटा एस.टी.स्टँड परिसरातून त्यास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले असता फरार आरोपी प्रविण ऊर्फ डॉलर सिताराम ओव्हाळ, (वय ३२ वर्षे, रा. वाळद ता. खेड जि पुणे) याचे अंगझडतीत त्याचे कंबरेला एक गावठी पिस्तुल व मॅग्झीनमध्ये दोन जिवंत काडतुस असा एकूण ५१,००० रू किं.चा मुद्देमाल मिळून आला आहे. सदर आरोपीवर आळेफाटा पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंदविणेत आलेला आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर, पोलीस अंमलदार दिपक साबळे, अक्षय नवले, संदिप वारे, राजू मोमीण, मंगेश थिगळे, विक्रम तापकीर, निलेश सुपेकर यांनी केली असून पुढील तपास आळेफाटा पोलीस स्टेशन करत आहे.



दैनिक **झुंजार जनता**

४ बुधवार दि. 19 /03/ 2025




# दिव्यात पुन्हा पालिकेची माघार

■ कारवाईविरोधात जोरदार निदर्शने ■ नागरिकांच्या रोषापुढे प्रशासन हतबल

**ठाणे** : दोन वेळा प्रयत्न करूनही दिव्यातील अनधिकृत इमारतींवर ठाणे महापालिकेला कारवाई करता आलेली नसून मंगळवारी देखील कारवाई करायला गेलेल्या पालिकेच्या अतिक्रमण पथकाला नागरिकांच्या रोषामुळे रिकाम्या हातीच परतावे लागल्याचे चित्र पहावयास मिळाले. पालिकेच्या कारवाईदरम्यान इमारतीमधील नागरिकांनी केलेल्या तीव्र निदर्शनामुळे पालिकेच्या पथकाला माघार घ्यावी लागली. काही नागरिकांनी तर थेट आत्महत्या करण्याचा इशाराच प्रशासनाला दिला. आक्रमक झालेल्या नागरिकांच्या पुढे प्रशासन पुन्हा एकदा हतबल झाल्याचे दिसून आले.

न्यायालयाच्या निर्देशानंतर दिव्यातील ५४ बेकायदा इमारतींवर कारवाई होणार असल्याचे निश्चित झाल्यानंतर या इमारतीमध्ये राहणाऱ्या रहिवाशांनी या कारवाईविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. यामध्ये दिव्यातील अनंत पार्क या इमारतीचा देखील समावेश आहे. काही दिवसांपूर्वीच प्रशासनाच्या कारवाईदरम्यान इमारतीवर प्रतीकात्मक फाशीचा दोर लावून रहिवाशांकडून पालिकेच्या कारवाईला विरोध करण्यात आला होता. आम्हाला बेघर केले तर आत्मदहन करण्याशिवाय आम्हाला पर्याय नसल्याचा इशारा इमारतींमध्ये राहणाऱ्या महिलांनी दिला होता. तर लाडक्या बहिणींना बेघर करणाऱ्या सरकारचा आम्ही निषेध करत असल्याचेही या महिलांनी सांगितले होते. ठाणे महापालिका क्षेत्रातील दिवा भागातील ५४ बेकायदा इमारती पाडण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे इमारतींमधील रहिवाशांना पालिका प्रशासनाने नोटीस बजावण्यास सुरुवात केली आहे. या कारवाईसाठी पोलीस बंदोबस्त मिळावा, यासाठी पालिका अधिकाऱ्यांनी पोलीस प्रशासनासोबत चर्चा सुरू केली आहे. त्याचबरोबर इमारतींचा वीज आणि पाणीपुरवठा खंडित करण्याचेही नियोजन आखले आहे, मात्र दिव्यातील अनंत पार्क या इमारतीवरील कारवाईला नागरिकांनी प्रचंड विरोध दर्शवला असल्याने या ठिकाणी अद्याप पालिका प्रशासनाला कारवाई करता आलेली नाही.



### नागरिकांचा आत्महत्येचा इशारा

दोन वेळा कारवाई करायला गेलेल्या ठाणे महापालिकेच्या अतिक्रमण पथकाला नागरिकांच्या विरोधामुळे कारवाई न करताच परतावे लागले होते. मंगळवारी देखील या इमारतीवर कारवाई करण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून करण्यात आला. मात्र जेसीबीच्या समोरच नागरिक उभे राहिल्याने पालिकेला कारवाई करता आली नाही, तर यावेळी नागरिकांनी प्रशासनाची प्रतीकात्मक प्रेतयात्राही काढली. उच्च न्यायालयाचे आदेश नसताना पालिकेने दडपशाहीने कारवाई केली तर आत्महत्या करण्याशिवाय आमच्याकडे पर्याय नसल्याचा इशारा यावेळी रहिवाशांकडून देण्यात आला.

## निवडक

### कोळी मल्हार समाजातर्फे विचार सभेचे आयोजन

**पालघर** : कोळी मल्हार समाजाच्या प्रगतीसाठी आणि समाजाच्या विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी रविवारी कासा केंद्रातील समाज मंदिरात विचार सभेचे आयोजन माजी आमदार राजेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. अध्यक्षीय भाषणात राजेश पाटील यांनी कोळी मल्हार समाजाची एक व्यापक संघटना असावी, अशी गरज व्यक्त केली. तसेच आपण सर्वांच्या सहकार्याने हे संघटन अधिक बळकट करण्याचे आवाहन समाज बांधवांना केले. सभेच्या अध्यक्षपदी बोईसर विधानसभेचे माजी आमदार राजेश पाटील होते. तसेच माजी जिल्हा परिषद अध्यक्षा व अनुसूचित जाती जमाती आयोग सदस्य वैदेही वाढाण, माजी आमदार अविनाश सुतार, जिल्हाध्यक्ष विलास बेलकर, सुनील झळके, माजी सभापती पांडुरंग बेलकर, नरेंद्र काळे, विष्णू वाघ, नरेंद्र पाटील, मोहन गुहे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### सहकारी गृहनिर्माण संस्थांचा स्वयं पुनर्विकास शिबीर

**पनवेल** : पनवेल-सिडको सहकारी गृहनिर्माण संस्था संघ मर्यादित यांच्या विद्यमाने आणि रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या सहकार्याने 'सहकारी गृहनिर्माण संस्थांचा इमारतींचा स्वयं पुनर्विकास' या विषयावर मार्गदर्शनपर शिबीर आयोजित करण्यात आले आहे. हे शिबीर रविवार, दिनांक २३ मार्च रोजी सकाळी १० वाजता पनवेल शहरातील विरुपाक्ष हॉल येथे होणार आहे. या शिबिराला मार्गदर्शक म्हणून विधान परिषदेतील भाजप गटनेते आणि मुंबई बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर, आमदार प्रशांत ठाकूर, सहकारी संस्था पनवेलचे सहाय्यक निबंधक भारती काटूळे यांची विशेष उपस्थिती असणार आहे.

### ज्येष्ठ लेखक रेमंड मच्याडो यांचा गौरव



**वसई** : कोकण मराठी साहित्य परिषदेच्या वसई शाखेचे कार्याध्यक्ष, तथा वसई मराठी ख्रिस्ती समाज साहित्य मंडळाचे अध्यक्ष रेमंड मच्याडो यांनी नुकताच अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. जिल्ह्यातील एक ज्येष्ठ लेखक, तथा सामाजिक कार्यकर्ते म्हणून सर्वत्र परिचित असलेले मच्याडो यांचा त्यांच्या अमृतमहोत्सवी (७५ व्या) वर्षारंभानिमित्ताने तालुक्यातील साहित्यिक आणि पत्रकारांच्या वतीने खास स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी कोमसा परिषदेचे जिल्हा कार्याध्यक्ष, तथा ज्येष्ठ पत्रकार अनिलराज रोकडे, कोमसा परिषदेच्या वसई शाखेचे कार्यावाह संतोष गायकवाड, निवृत्त शिक्षिका लीला डायस व शिक्षिका ग्रेनीटा मच्याडो प्रामुख्याने उपस्थित होते.

# ठाणे-मुलुंडदरम्यानच्या नवीन रेल्वे स्थानकाच्या कामाला गती द्यावी

## खासदार नरेश म्हस्के यांची लोकसभेत मागणी | कोकणच्या सर्व गाड्यांना दिवा स्थानकावर थांबा मिळावा

**नवी मुंबई** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय रेल्वेच्या माध्यमातून संपूर्ण देशाला जोडले जात आहे. त्याचबरोबर महाराष्ट्राच्या रेल्वे विकासात गेल्या दशकभरात ऐतिहासिक बदल घडले आहेत. ठाणे आणि मुलुंड स्टेशन दरम्यानच्या नवीन रेल्वे स्थानकाच्या कामाला गती द्यावी, दिवा-रत्नागिरी पॅसेंजर ट्रेन पुन्हा दादरपर्यंत सुरू करावी, कोकणच्या सर्व गाड्यांना दिवा स्थानकावर थांबा द्यावा, अशा विविध मागण्या ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के यांनी संसदेत केल्या.

लोकसभेत रेल्वे मंत्रालयाशी संबंधित अनुदानित मागण्यांवर चर्चा करतांना ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के यांनी ठाणे, कल्याण, भिवंडी, पालघर लोकसभा मतदारसंघातील रेल्वे प्रवाशांच्या अडचणी, सोयीसुविधा आणि त्याचबरोबर नवीन गाड्या सुरू करण्यासंदर्भात आग्रही मागण्या केल्या. महाराष्ट्रातील रेल्वे सेवेला अधिक वेग आणि सुरक्षितता देण्यासाठी खासदार नरेश म्हस्के यांनी रेल्वेमंत्र्यांकडे विविध मागण्या केल्या. कल्याण-पनवेल (कळंबोली मार्गे) लोकल सेवा सुरू करावी. कल्याण-वाशी (ऐरोली मार्गे) लोकल सेवा सुरू करावी, जेणेकरून ठाणे स्थानकावरील प्रवाशांचा भार कमी होईल.

ट्रान्स हार्बर मार्गावर ठाणे ते उरण लोकल सेवा सुरू करावी. ठाणे, कल्याण, डोंबिवली आणि बदलापूरहून महिलांसाठी विशेष लोकल सुरू करावी. सर्व स्थानकांवर स्वच्छ आणि दर्जेदार शौचालयांची व्यवस्था करावी. अपघातग्रस्त प्रवाशांना तत्काळ सरकारी व खासगी रुग्णालयात मोफत उपचार मिळावेत. कल्याण, ठाणे, डोंबिवली येथे एडीआरएम स्तराचे अधिकारी नियुक्त करावेत. ठाणे जिल्ह्यातील सर्व रेल्वे स्थानकांवर सीसीटीव्ही बसवावे. रेल्वे उड्डाणपूल व अंडरपास प्रकल्प जलद पूर्ण करावेत, अशी मागणी खासदार म्हस्के यांनी केली. राज्यात ११ वंदे भारत गाड्या १९ जिल्ह्यांना जोडत आहेत. तर अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत १३२ स्थानकांचे नूतनीकरण सुरू आहे. ४७ मोठ्या प्रकल्पांसाठी रुपये १,५८,८६६ कोटींची गुंतवणूक आणि १,०६२ नवीन उड्डाण पूल व अंडरपासेसने महाराष्ट्राच्या रेल्वे विकासाला नवी दिशा दिली जात असल्याचे खा. म्हस्के यांनी सांगितले.

### वाढीव खर्च रेल्वेने करावा



ठाणे आणि मुलुंड स्टेशनच्या दरम्यान नवीन स्टेशनचे काम सुरू आहे, हे काम रेल्वे करीत आहे. परंतु खर्च ठाणे महानगरपालिका करीत आहे, त्याचा वाढीव खर्च रेल्वेने करावा व अधिकाऱ्यांना तसे निर्देश द्यावेत व नवीन रेल्वेच्या कामाला गती द्यावी. याचबरोबर स्टेशनवरची वन रुपीज क्लिनिक केंद्रे बंद आहेत ती लवकरात लवकर सुरू करावीत. ठाणे, नवी मुंबई, मीरा-भाईंदर, कल्याण अशा सर्व ठिकाणी ऑटोमॅटिक जिन्यांची सोय करावी, अशा विविध मागण्या खासदार नरेश म्हस्के यांनी संसदेत केल्या.

### आधुनिक तंत्रज्ञानाच्या यादीत भारताचा समावेश

१७० वर्षांनंतर, देशाची पहिली बुलेट ट्रेनही ठाणे मार्गे मुंबईला जाणार आहे. विशेष म्हणजे मुंबई-ठाणे दरम्यान देशातील पहिली 'अंडर सी टनेल' म्हणजे समुद्राखालून जाणारा बोगदा बांधण्याचे ऐतिहासिक काम सुरू झाले आहे. हे आधुनिक तंत्रज्ञान आजपर्यंत फक्त जगभरात केवळ पाच देशांकडे होते, पण आता त्या यादीत भारताचा देखील समावेश झाला आहे.

> महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वामुळे बुलेट ट्रेनचे काम वेगाने सुरू आहे. पण महाविकास आघाडी सरकार सत्तेत असताना उद्धव ठाकरे यांनी या प्रकल्पाला 'व्हाइट एलिफंट' (निरुपयोगी प्रकल्प) म्हणून हिणवले होते अशी टीका म्हस्के यांनी केली. पण आता महाराष्ट्राच्या जनतेला 'स्पीड ब्रेकर' नव्हे, तर 'एक्स्प्रेस-वे'सारखा वेगवान विकास हवा आहे. मोदी सरकारच्या दूरदृष्टीमुळे महाराष्ट्रात रेल्वे क्षेत्रात अभूतपूर्व क्रांती होत आहे.
>
> - **नरेश म्हस्के**, खासदार



# आशासेविकांचा एल्गार!

## महापालिकेच्या अधिकाऱ्यांविरोधात भडका

**उल्हासनगर** : समाजाच्या आरोग्यसेवेसाठी अहोरात्र झटणाऱ्या आशासेविकांना त्यांचे कर्तव्य बजावत असताना मारहाण आणि विनयभंगाचा सामना करावा लागतो, ही बाब अत्यंत संतापजनक आणि लाजीरवाणी आहे. या निष्काळजीपणा आणि हलगर्जीपणाचा निषेध करत सोमवारी महाराष्ट्र राज्य गटप्रवर्तक व आशास्वयंसेविका संघाच्या वतीने मोठ्या संख्येने मोर्चा काढण्यात आला. या आंदोलनात सहभागी झालेल्या आशासेविकांनी संबंधित आरोग्य अधिकारी डॉ. मोहिनी धर्मा यांच्या तत्काळ निलंबनाची जोरदार मागणी केली.

उल्हासनगर कॅम्प नंबर ४ येथील भरतनगर भागात टीबी सर्वेक्षण करणाऱ्या दोन आशासेविकांना आकाश वानखेडे या तरुणाने अश्लील शिवीगाळ करत मारहाण केली. या हल्ल्यात दोन्ही सेविका गंभीर जखमी झाल्या होत्या. या घटनेची तक्रार करण्यासाठी त्या पोलीस ठाण्यात पोहोचल्या, मात्र विठ्ठलवाडी पोलिसांनी तब्बल पाच तास तक्रार घेण्यास विलंब करत टाळाटाळ केली. संतप्त झालेल्या शेकडो आशासेविकांनी संघटनेचे सरचिटणीस भगवान दवणे, गंगाताई लोंढे आणि डॉ. रासकर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस ठाण्याच्या समोर ठिय्या आंदोलन केले.

### आता पुढे काय?

महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणा विरोधात आशासेविकांनी उचललेले हे पाऊल प्रशासनाला जबाबदार धरण्यासाठी महत्त्वाचे आहे. या प्रकरणात पोलिसांनी विलंब का केला? आरोग्य अधिकारी का निष्क्रिय राहिले? आणि आशासेविकांना भविष्यात अशा घटनांपासून कसे संरक्षण मिळणार? हे प्रश्न अनुत्तरित आहेत.

# डेब्रिज टाकणाऱ्या डम्परवर कारवाई



**पनवेल** : नवीन पनवेलमधील सिडकोच्या मोकळ्या जागेत अनधिकृतपणे डेब्रिज टाकण्यासाठी आलेले ६ डम्पर सिडकोच्या पथकाने पोलिसांच्या मदतीने पकडण्याची कारवाई सोमवारी दुपारी नवीन पनवेलमध्ये केली. या कारवाईत पोलिसांनी ६ डम्पर जप्त करून सर्व डम्परचालकांना ताब्यात घेतले आहे. पनवेल शहर पोलिसांनी या सर्वांविरोधात गुन्हा दाखल करून सदरचे डेब्रिज टाकण्यास सांगणाऱ्या डेब्रिज माफियांचा शोध सुरू केला आहे.

नवीन पनवेल सेक्टर-२० भागातील सिडकोच्या भूखंड क्रं.१ व ८ वर रेबीट, माती व दगड असे मानवी आरोग्यास धोकादायक असलेले डेब्रिज टाकण्यासाठी काही डम्पर आले होते. याबाबतची माहिती सिडकोच्या पथकाला मिळाल्यानंतर सिडकोच्या पथकाने सेक्टर २० मध्ये जाऊन पाहणी केली असता, ६ डम्परचालक त्याठिकाणी डेब्रिज टाकत असल्याचे आढळून आले. त्यामुळे सिडकोच्या पथकाने पोलिसांच्या मदतीने डेब्रिजने भरलेले ६ डम्पर व त्याच्यावरील चालक खुर्शाद अन्सारी, आशिष कश्यप, दत्ता चव्हाण, मदन औसरमल, राकेश केवट व गौरव महातोर या सहा जणांना ताब्यात घेतले.

या सर्व डम्परचालकांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सिडको परिक्षेत्रात अनधिकृत डेब्रिज टाकत असताना कोणी आढळल्यास सिडकोच्या www.cidco.maharashrta.gov.in या वेबसाइटवर तसेच संबंधित पोलीस ठाण्यात कळविण्यात यावे, असे आवाहन सिडकोकडून करण्यात आले आहे.

# रिक्त पदांमुळे आगरदांडा प्राथमिक आरोग्य केंद्र व्हेंटिलेटरवर

**मुरूड-जंजिरा** : आगरदांडा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आजूबाजूस २२ गावांची वस्ती असून येथे हे एकमेव आरोग्य केंद्र आहे. मुरूड तालुक्यातील आगरदांडा ग्रामपंचायत हद्दीतील आगरदांडा प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेवकांच्या रिक्त पदांमुळे हे आरोग्य केंद्र व्हेंटिलेटरवर असल्याची स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे या केंद्रांतर्गत येणाऱ्या आजूबाजूच्या गावातील नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणारे हे उपकेंद्र अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे रुग्णांना आरोग्य सेवा देताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच याचा ताण आरोग्य सेविकांवर पडत असल्याचे



दिसून येत आहे. आरोग्याच्या दुष्टीने महत्त्वाचे असलेल्या आरोग्य केंद्राबाबत प्रशासन उदासीन असल्याचे चित्र दिसून येत आहे. तरी या गंभीर विषयाकडे जिल्हा आरोग्य विभागाने याकडे लक्ष देऊन राजपुरी, सावली, शिघ्रे, आगरदांडा, महालोर व खारअंबोली या ठिकाणीच्या उपकेंद्रातील आरोग्य सेवकांची रिक्त पदे तत्काळ भरण्याची मागणी स्थानिकांनी केली आहे.

या संदर्भात मुरूड तालुक्याचे आरोग्य अधिकारी पायल राठोड यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की आरोग्य सेवकांची ६ पदे रिक्त आहेत. या संदर्भात आमच्या वरिष्ठ पातळीवर पत्रव्यवहार केला आहे. लवकरच या ठिकाणी आरोग्य सेवकांची भरती केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

# चाकू घेऊन फिरणाऱ्यास अटक



**उल्हासनगर** : धुलिवंदनाच्या सणात एका तडीपार गुंडाने हातात धारदार चाकू घेऊन दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मात्र, सतर्क उल्हासनगर पोलिसांनी वेळीच कारवाई करत या गुंडाला अटक केली. त्यामुळे संभाव्य अनर्थ टळला.

उल्हासनगर कॅम्प दोनमधील आझादनगर येथे राहणारा सुमित उर्फ पप्पू यादव हा तडीपार गुन्हेगार आहे. जुलै महिन्यात पोलीस उपायुक्तांनी त्याला दोन वर्षांसाठी ठाणे, मुंबई शहर, उपनगर आणि रायगड जिल्ह्यातून हद्दपार केले होते. मात्र, आदेशाचा भंग करत तो पुन्हा उल्हासनगर शहरात परतला आणि धुलिवंदनाच्या दिवशी एमआयडीसी पाण्याच्या टाकीजवळ हातात चाकू घेऊन नागरिकांमध्ये दहशत माजवत फिरत होता.

या घटनेची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विष्णू ताम्हाणे यांना मिळताच यांच्या पथकाने सापळा रचून यादवला ताब्यात घेतले आणि त्याच्या ताब्यातील धारदार शस्त्र जप्त करून अटक केली. या प्रकरणी सुमित यादववर हद्दपार आदेशाचा भंग केल्याचा आणि अवैध शस्त्र बाळगल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ घरकुल व फिडर



**२० मार्च जागतिक चिमणी दिवसाचे औचित्य साधून स्पॅरोताई फाऊंडेशनतर्फे मंगळवारी ठाण्यातील टिकुजिनीवाडी येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येथे चिमणी संवर्धन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये चिऊताईसाठी टाकाऊ वस्तूंपासून घरकुल व फिडर बनवण्याची स्पर्धा संपन्न झाली. यावेळी मुलांनी घरकुल व फिडर साकारले. (छाया : दीपक कुरकुंडे)**

**संरक्षण आणि पर्यटनाच्या दिशेने स्थानिक प्रशासनाचे मोठे पाऊल**

# किहीम किनाऱ्यावर ऑलिव्ह रिडले कासवाचे आगमन

**अलिबाग** : अलिबाग तालुक्यातील किहीम समुद्रकिनाऱ्यावर दुर्मिळ ऑलिव्ह रिडले कासवाचे आगमन झाले आहे. हे कासव पर्यटकांनी पाहिले असून, स्थानिक प्रशासनाने तातडीने त्याच्या संरक्षणासाठी उपाययोजना केल्या आहेत. सरपंच प्रसाद गायकवाड यांच्या पुढाकाराने या कासवाच्या सुरक्षेसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.

किहीम बीचवर सध्या सुरक्षारक्षक तैनात करण्यात आले असून, दिवसरात्र या कासवाचे



संरक्षण केले जात आहे. समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांची मोठी गर्दी होत असल्याने प्रशासनाने लोकांना सुरक्षित अंतर राखण्याचे आवाहन केले आहे. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनीही घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला आहे.

ऑलिव्ह रिडले कासवांचा वावर हा परिसरातील पर्यावरणीय समतोलासाठी महत्त्वाचा असून, त्यांच्या सुरक्षिततेसाठी सर्व नागरिकांनी सहकार्य करणे गरजेचे आहे. स्थानिक प्रशासन आणि वन विभागाने नागरिकांना विनंती केली आहे की, समुद्रकिनाऱ्यावर कासवाच्या जवळ न जाता, त्याच्या नैसर्गिक हालचालींमध्ये व्यत्यय आणू नये. ही घटना किहीमसाठी अभिमानाची असून, भविष्यातही अशी जैवविविधता जपण्यासाठी प्रशासन आणि स्थानिक नागरिकांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

### जनजागृती करण्यासाठी उपक्रम

ऑलिव्ह रिडले कासव हे जगभर दुर्मिळ मानले जाते आणि भारतातील काही समुद्रकिनाऱ्यांवरच ते आढळते. किहीममध्ये अशा दुर्मिळ कासवाचे आगमन झाल्यामुळे या ठिकाणाच्या जैवविविधतेचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. स्थानिक प्रशासनाने या नैसर्गिक घटनेचा पर्यटन विकासासाठी योग्य वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. भविष्यात या भागात समुद्री जीवन आणि पर्यावरण संरक्षण याबाबत अधिक जनजागृती करण्यासाठी उपक्रम राबवण्याचा विचार केला जात आहे.

# भिवंडीत तडीपार आरोपी गजाआड

**भिवंडी** : भिवंडी परिमंडळ - २ चे पोलीस उपायुक्त यांनी भिवंडीतील एका अट्टल गुन्हेगार आरोपीच्या विरोधात तडीपारीची कारवाई केलेली असतानाही तो हद्दपार केलेल्या क्षेत्रात दिसून आल्याने त्यास गुन्हे शाखा घटक-२ च्या पोलीस पथकाने ताब्यात घेऊन अटक केली आहे.

रईस अब्दुल खालीद मोमीन (३३) असे हद्दपार अट्टल गुन्हेगाराचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार रईस याच्या विरोधात भिवंडी परिमंडळ-२ च्या पोलीस उपायुक्तांनी ३० एप्रिल रोजीच्या आदेशानुसार १२ महिन्यांकरिता ठाणे, बृहन्मुंबई, मुंबई उपनगरे व पालघर या जिल्ह्यांमधून हद्दपारीची कारवाई केली आहे.

परंतु असे असतानाही रईस हा १७ मार्च रोजी भिवंडीतील कॉटर गेट मस्जिदीसमोरील आझाद मैदानाच्या गेटजवळ दिसून आल्याने त्याने मनाई आदेशाचा भंग केल्याने त्याच्यावर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्यास ताब्यात घेऊन अटक केली आहे.

Printed By, Published By, on behalf of: **Ismail Salim Shaikh,** Printed at Meher Creative Graphics, Chistiya Colony, N-5, Cidco, Tq. & Dist. Aurangabad 431003 (Maharashtra) and published from **Zunjar janta** gulshan nagar, Sillod, Tq. Sillod, Dist. Aurangabad - 431112 (Maharashtra), Editor - **Ismail Salim Shaikh,** Mob:- **8180068180** E-mail: zunjarjanta@gmail.com **RNI NO. MAHMAR/2022/82590**

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक **इस्माईल सलीम शेख** यांनी मेहेर क्रिएटिव्ह ग्राफिक्स चिश्तिया कॉलोनी -५ सिडको औरंगाबाद - ४३१००१ (महाराष्ट्र) येथे छापून, **झुंजार जनता**, कार्यालय गुलशन नगर सिल्लोड ता. सिल्लोड जिल्हा औरंगाबाद -४३११९२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - **इस्माईल सलीम शेख** संपर्क ८१८००६८१८० E-mail: zunjarjanta@gmail.com **RNI NO. MAHMAR/2022/82590**